सोमवार, ११ सप्टेंबर २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ४२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● MONDAY 11 SEPTEMBER 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-42 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

## महत्त्वाची बातमी

### ऋषी सुनक यांनी सपत्नीक घेतले अक्षरधामचे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारतीय वंशाचे ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक जी २० शिखर परिषदेसाठी सपत्नीक भारतात आले आहेत. भारतात आल्यानंतर त्यांनी आज दिल्लीतील अक्षरधाम मंदिराला भेट दिली. यावेळी त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी अक्षता मूर्तीही उपस्थित होत्या.
सकाळी ६.४५ वाजता सुनक आणि त्यांचा ताफा दिल्लीतील जुने हिंदू मंदिर असलेल्या अक्षरधाम मंदिरात पोहोचला. यावेळी मंदिराचे आध्यात्मिक नेते महंत स्वामी महाराज यांच्या हस्ते त्यांनी पूजा केली. यावेळी ब्रिटीश पंतप्रधानांना स्वामीनारायण अक्षरधामचे विहंगावलोकन दाखवण्यात आले. अक्षरधाम मंदिर १०० एकर जागेवर पसरले असून हे मंदिर अध्यात्मिक आणि सांस्कृतिक संकुल असून भारताच्या परंपरा आणि प्राचीन वास्तूचा नमुना आहे. मुख्य मंदिरात सुनक आणि त्यांच्या पत्नीने पवित्र प्रतिमांना आदरांजली वाहिली. तसेच, त्यांनी कला आणि वास्तुकलेची प्रशंसा केली. या जोडप्याने नीळकंठ वर्णी महाराजांच्या मूर्तीवर अभिषेक देखील केला आणि जागतिक शांतता, प्रगती आणि सौहार्द यासाठी प्रार्थना केली. यावेळी ऋषी सुनक म्हणाले की, आम्ही या मंदिराच्या सौंदर्य, शांतता, सौहार्दाने आनंदित झालो आहोत. हे केवळ प्रार्थनास्थळच नाही, तर भारताची मूल्ये, संस्कृती आणि जगासमोरील योगदानाचेही चित्रण करणारी एक महत्त्वाची खूण आहे. ब्रिटनमध्ये ब्रिटिश भारतीय समुदायाने आपल्या देशासाठी केलेल्या सकारात्मक योगदानातून हीच मूल्ये आणि संस्कृती आपण आज ब्रिटनमध्ये पाहतो.

# स्वस्ति अस्तु विश्व

## जी 20 परिषदेचे समापन

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली: भारतात सुरू असलेल्या जी-20 परिषदेचा रविवारी समारोप झाला. पुढील वर्षी जी-20 परिषद आता ब्राझीलमध्ये होणार आहे. पंतप्रधान मोदी यांनी अध्यक्षपदाची जबाबदारीची सूत्रे ब्राझीलचे राष्ट्रपती लुला डिसील्वा यांच्याकडे सोपवली. पंतप्रधान मोदी यांनी 'स्वस्ति अस्तु विश्व' या शांततेच्या प्रार्थनेसह परिषदेचा समारोप केला. त्यांनी म्हटले की, एक पृथ्वी, एक कुटुंब आणि एक भविष्याचा रोडमॅप आनंददायक असेल. 140 कोटी भारतीयांच्या शुभेच्छांसह तुम्हा सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो. मी ब्राझीलचे राष्ट्रपती लुईझ इनासिओ यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा देतो आणि त्यांच्याकडे G-20 चे अध्यक्षपद सोपवतो, असे पंतप्रधानांनी म्हटले.**

पंतप्रधान मोदी म्हणाले, "नोव्हेंबरपर्यंत जी-20 चे अध्यक्षपद भारताकडे आहे. या दोन दिवसांत तुम्ही अनेक गोष्टी आणि प्रस्ताव मांडले आहेत. जे काही सूचना येतील ते स्वीकारण्याची आणि ते कसे ते पाहण्याची जबाबदारी आमची आहे. त्याबाबत काही होऊ शकते का? याचा विचार होईल. आपण नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस G-20 चे दुसरे व्हर्च्युअल सत्र आयोजित करू. यामध्ये या परिषदेदरम्यान ठरलेल्या विषयांचा आढावा घेऊ शकतो. या सर्व गोष्टींचा तपशील आमच्या टीमद्वारे शेअर केला जाईल. मला आशा आहे की तुम्ही सर्वजण याच्याशी कनेक्ट व्हाल, असेही पंतप्रधान मोदी यांनी म्हटले.
पीएम मोदींनी ट्विटरवर जी-20 बाबत पोस्ट करताना म्हटले की, भारताने ब्राझीलला



अध्यक्षपद सोपवले आहे. आम्हाला अढळ विश्वास आहे की ते समर्पण, दूरदृष्टीने नेतृत्व करतील आणि जागतिक एकता तसेच समृद्धी वाढवतील. भारताने आगामी G-20 चे अध्यक्षपद ब्राझीलला सोपवले आहे. त्यांच्या अध्यक्षपदाच्या काळात ब्राझीलला ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुला डिसील्वा यांनी म्हटले की, जेव्हा आम्ही महात्मा गांधींना श्रद्धांजली वाहण्यासाठी गेलो तेव्हा मी खूप भावूक झालो. माझ्या राजकीय जीवनात महात्मा गांधींना खूप महत्त्व आहे. महात्मा गांधींना आदरांजली वाहताना मी भावूक झालो, असेही ब्राझीलच्या राष्ट्राध्यक्षांनी म्हटले.

# वल्लभभाई पटेलांनी निजामाच्या अत्याचारातून मराठवाडा मुक्त केला

## उद्धव ठाकरे : जळगावात छत्रपती शिवराय, वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्याचे अनावरण

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते जळगावात छत्रपती शिवाजी महाराज आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. वल्लभभाई पटेलांनी निजामाच्या अत्याचारातून मराठवाडा मुक्त केला, असे उद्धव ठाकरे म्हणाले. यावेळी उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यावर जोरदार टीका केली आहे. उद्धव ठाकरे यांनी मी वचन दिले तर विसरत नाही, शब्द दिला तर विसरत नाही, असे म्हटले. शिवसेनाप्रमुखांनी शब्द देताना लाख वेळा विचार कर, शब्द दिला की प्राण गेले तरी बेहत्तर पण शब्द पडू द्यायचा नाही, असे शिकवले, असल्याचे ठाकरे म्हणाले.
तरुणपिढी जळगावला प्रगतीपथावर नेत आहे याचा अभिमान आहे. सरदार वल्लभभाई पटेल यांचा अभिमान आहे. गुजरातमध्ये वल्लभभाई पटेल यांचा ऊंच पुतळा उभारण्यात आला. आजपर्यंत कधीही भाजप आणि त्यांच्या मातृसंस्थेने ज्याला आदर्श मानावे अशा व्यक्ती निर्माण केल्या नाहीत. मणिपूरमध्ये काय चालले याच्या बातम्या येत नाहीत. महिलांची विटंबना झाली त्यावर कोणी काय बोलत नाही. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी जी २० ची लगबग करत आहेत. आमचे मुख्यमंत्री तिकडे गेले आहेत, बेकायदा मुख्यमंत्री असे कोर्टाचे म्हणणे आहे. हे तिकडे गेले आहेत, बायडनशी बोलणार, ऋषी सुनक यांच्यासोबत फोटो काढला पण बोललात काय ते सांगा असा सवाल उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांना केला. इंडियाच्या बैठकीत मला तुमच्यामुळं किंमत मिळाली. त्या बैठकीनंतर गद्दारांनी आणि ज्यांनी गद्दारी करायला लावली त्यांनी होर्डिंग्ज लावली. बाळासाहेबांचा फोटो आणि मी शिवसेनेची काँग्रेस होऊ देणार नाही असं होर्डिंग होतं. शिवसेनेची काँग्रेस होणारचं नाही असं उद्धव ठाकरे म्हणाले. आम्ही पण मग होर्डिंग्ज लावलं आम्ही शिवसेनेला कमळाबाईची पालखी वाहायला देणार नाही. कमळाबाईची पालखी वाहायला म्हणून बाळासाहेबांनी शिवसेनेला जन्म दिलेला नाही, उद्धव ठाकरे म्हणाले.
मुख्यमंत्र्यांना जरांगे पाटील यांना भेटायला जायला वेळ नाही. त्यांच्याशी किमान बोलातरी, असं उद्धव ठाकरे म्हणाले. अंतरवाली सराटीतील आंदोलकांचे काय चुकले होते? पोलीस आले आणि मारु लागले, जालियवाला जसे घडले होते तसा कोणी तरी जालनावाला आलेला आहे, असा टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला.

# कोपर्डी प्रकरणातील आरोपीची आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** जिल्ह्यातील कोपर्डी हत्याकांडाने महाराष्ट्र हादरला होता. याप्रकरणातील आरोपी पुण्यातील येरवडा कारागृहात शिक्षा भोगत आहेत. यातील जितेंद्र शिंदे या आरोपीने कारागृहात गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. पहाटेच्या सुमारास पोलीस कर्मचारी गस्तीवर गेले असताना जितेंद्र शिंदेने आत्महत्या केल्याचे समोर आले.
अहमदनगर येथील कोपर्डीत १३ जुलै २०१६ रोजी एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून निर्घृणपणे खून केल्याची घटना घडली होती. या खूनप्रकरणातील आरोपी जितेंद्र शिंदे हा येरवडा कारागृहात शिक्षा भोगत होता. १० सप्टेंबर कारागृहात गस्तीवर असलेल्या कर्मचाऱ्याला जितेंद्र शिंदे हा गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला.

# रायन मिनिथॉनने छ. संभाजीनगरात उत्साहाचा संचार


## मोईन-उल उलूम स्कूल विजेता, रायन इंटरनॅशनल स्कूल प्रथम उपविजेता, ब्लूमिंग बर्ड् स्कूल द्वितीय

आधुनिक केसरी न्यूज

छत्रपती संभाजीनगर : रायन स्पोर्ट्स क्लब, इंडिया आयोजीत रायन मिनिथॉन स्पर्धा आज मोठया उत्साहात पार पडली.ही मिनिथॉन स्पर्धा १२ वर्षांखालील, १४ वर्षांखालील आणि १६ वर्षांखालील मुली आणि मुलांसाठी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत रायन मिनिथॉनसाठी ४५ हून अधिक शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता, तर २००० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.
या मिनिथॉन स्पर्धेत मोईन-उल-उलूम शाळेने ४१ गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकाउन विजेता, तर रायन इंटरनॅशनल स्कूल २८गुण मिळवत प्रथम उपविजेता आणि २० गुण मिळवत ब्लूमिंग बर्ड या शाळेने द्वितीय उपविजेता चॅम्पियनशिप पटकावली.
रायन मिनिथॉनची सुरुवात औरंगाबादमध्ये गेल्या १० वर्षांपासून उल्लेखनीय आणि गौरवशाली ठरत आहे. याचे आयोजन रायन स्पोर्ट्स क्लब, इंडियाने केले आहे. या क्लबची स्थापना शाळेचे अध्यक्ष डॉ. ए.एफ. पिंटो आणि रायन गुरप ऑफ इन्स्टिट्यूशन्सचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ग्रेस पिंटो यांनी केली आहे. हे विद्यार्थ्यांना त्यांच्या क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन करण्यासाठी व्यासपीठ प्रदान करते. रायन स्पोर्ट्स क्लबने विद्यार्थ्यांसाठी पोलिस सुरक्षा, वैद्यकीय सुविधा आणि सहभागींसाठी पिण्याचे पाणी आणि स्वच्छतागृहांची सर्व व्यवस्था केली होती.
रायन मिनिथॉनसाठी ४५ हून अधिक शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.
औरंगाबाद सेंट जॉन्स हायस्कूल पैठण रोड, रायन इंटरनॅशनल स्कूल, डिव्हाईन चाइल्ड, लिटल फ्लॉवर, औरंगाबाद पब्लिक स्कूल, मोईन-उल उलूम, सरोश, पीयू जैन स्कूल, सरोश, बुरहानी नॅशनल, ओम बालक मंदिर, स्कॉलर,, न्यू बिगिनिंग, वल्ड स्कूल, मोईन-उल-उलूम हायस्कूल, मिलिंद मल्टीपर्पज स्कूल, सेंट झेवियर्स, ऑयस्टर, सेंट जॉन स्कूल जळगाव रोड. जालना येथील सेंट जॉन एएमडी रायन इंटरनॅशनल स्कूल या उपक्रमात सहभागी



झाले होते. सेंट फ्रान्सिस, होली क्रॉस, सेंट लॉरेन्स, ए.के.चे काही विद्यार्थी. वाघमारे, ऐस अकादमी, पिनाकेश्वर शाळा, औरंगाबादची विंचेस्टर शाळा आणि उर्दू हायस्कूल, एम.एस. जैन स्कूल, पोदार हायस्कूल जालना यांनी विविध वयोगटांसाठी वैयक्तिकरित्या सहभाग घेतला. यावेळी औरंगाबादचे बिशप रेव्ह बिशप अम्ब्रोस रेबेलो, खासदार इम्तियाज जलील, उपजिल्हाधिकारी,भरत कदम, एसीपी, रणजित पाटील, सुमीत त्रिवेदी, डॉ. रेणुका भावसार, डॉ. अहनहम चुमनो, , विनोन पास्टर ,अब्राहम घुमरे, डॉ. किरण ठाकरे, डॉ. विजय निकम, , सौ. लता जाधव, सौ. सुजाता खरात, , अनिल चाबुकस्वार, अरुण सुरडकर, दीपक पुराणिक, कमा. पीयूष भावसार, संजय गुजराथी,आदी मान्यवरांनी उपस्थिती होती. औरंगाबाद शहरात एवढा मोठा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल पाहुण्यांनी आपल्या भाषणात शाळेचे अध्यक्ष डॉ. ए.एफ. पिंटो आणि व्यवस्थापकीय संचालक मॅडम ग्रेस पिंटो यांचे कौतुक केले. या स्पर्धेसाठी बेगमपुराचे पोलीस निरीक्षक आणि पोलीस विभागाचे कर्मचारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे अधिकारी, डॉ. सोमाणी आणि एमजीएम रुग्णालयातील त्यांची टीम. , वैद्यकीय मदतीसाठी मातोश्री हॉस्पिटलचे डॉ. ठाकरे, साई गणेशचे मालक दीपक नाईक, डी एंटरप्रायझेसचे मालक अनिल चाबुकस्वार, विविध वृत्तपत्रांचे पत्रकार विद्यार्थ्यांचे पालक आणि शिक्षक यांनी रायन मिनिथॉन यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले .




## उगवतीचे रंग


आधुनिक केसरी

श्यामरावांकडे आलेल्या भार्गवी वहिनी, भगवानराव तसेच चैतन्य आणि पिंकी आणि राजेश यांची छान गप्पा मारत जेवणं झाली. सगळ्यांची जेवणं झाल्यावर सगळे श्यामरावांच्या गच्चीवर आले. श्यामरावांनी गच्चीवर छान बाग केली होती. गच्चीवर सुंदर लाईट्स बसवले होते. श्यामलाताई आणि भार्गवी वहिनी झोपाळ्यावर बसल्या. मुलांनी छानपैकी बुद्धिबळाचा डाव मांडला होता. श्यामराव आणि भगवानराव यांचीही कुठल्यातरी विषयावर चर्चा सुरु होती. पिंकीने भार्गवी काकूंच्या अंगावरील साडी पाहिली. तिला ती खूपच आवडली होती. ती म्हणाली, ' काकू, ही साडी किती सुंदर आहे ! तुमच्या रंगाला अगदी खुलून दिसते. ' भार्गवी वहिनी म्हणाल्या, ' पिंकी, या साडीला कांचीपुरम किंवा कांजीवरम साडी म्हणतात. मागे काका तामिळनाडूच्या दौऱ्यावर गेले होते ना , तेव्हा त्यांनी येताना ही साडी आणली. आज एका ठिकाणी लग्नानिमित्त आयोजित केलेल्या स्वागत समारंभाला जायचे होते म्हणून ही साडी नेसून आले. ' ' खरंच, किती तलम आणि नक्षीदार साडी आहे ! या साड्या तिकडेच तयार होतात का ? ' पिंकी म्हणाली. तेवढ्यात या गप्पांकडे श्यामराव आणि भगवानरावांचे लक्ष गेले. श्यामराव हसत म्हणाले,' भगवान, आता साड्यांवरून गप्पा सुरु झाल्या. ' बाबा. तू तिकडून येताना वहिनींसाठी साडी आणलीस. आता श्यामला मला म्हणणार, ' बघा, भावजींनी कशी साडी आणली तिकडून येताना वहिनींसाठी. श्यामलाताई हसत म्हणाल्या, ' अगदी बरोबर बोललात. मला पण तशी साडी हवी आहे बरं का ! '

अहो वहिनी, काही काळजी करू नका आणि त्या श्यामच्या मागे तर अजिबात लागू नका साडीसाठी. तुम्हाला काय वाटलं मी फक्त भार्गवीसाठीच साडी आणली ? मी येताना तुमच्यासाठी सुद्धा साडी आणली आहे. फक्त मला तुम्हाला आताच सांगायचं नव्हतं. पण आता तो विषय निघाला आणि मी सांगून टाकलं. पुढच्या महिन्यात तुमच्या लग्नाचा वाढदिवस आहे ना, त्या वेळी ती साडी तुम्हाला द्यायची असं ठरवलंय मी आणि भार्गवीनं, ' भगवानराव हसत म्हणाले. वा भगवान, तू तर ग्रेटच आहेस बाबा. मला काही बोलायचंच काम ठेवलं नाहीस. ' श्यामराव म्हणाले. ' ग्रेट बिट काही नाही. ते महत्वाचं नाही, पण तुम्हाला माहिती आहे का ही साडी तामिळनाडूतील कांचीपुरम इथे तयार होते आणि ती विणणारे जे विणकर आहेत, त्यांना महर्षी मार्कंडेयांचे वंशज समजले जाते.



## स्वयंपूर्ण ग्रामीण भारत



## आनंदी पहाट

## जुनं ते सोनं; तरीही नवं पण हवं

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

एकीकडे जुनं ते सोनं म्हणणारी व्यक्ती काहीवेळा नंतर नवं ते हवं, असंही म्हणायला सुरुवात करते. अनेक जुन्या आठवणी, वातावरण, ठिकाण, विचार, जुने कपडे अशा अनेक जुन्या गोष्टींचा कालांतरानं आपल्याला तिटकारा यायला लागतो, त्या नकोशा वाटायला लागतात. काहीतरी नवं असं वाटायला लागतं. नव्यामध्ये नाविन्य सामावलेलं असतं, ह्याची जाणीव झाली कि मग जुनं नकोसं होऊ लागतं. एका दृष्टीनं ते चांगलंच असतं. आपल्या वैचारिक चौकटीला भेदून, तिला छेद देऊन आपण नवविचारांचा अंगीकार त्यायोगे करायला सुरुवात करतो. हा बदल अनेकदा योग्यच ठरतो. नाविन्यपूर्ण अनुभूतीची आपल्या अंतर्मनाला अधिक जरुरी असते.

कोणत्याही नवीन गोष्टीचा स्वीकार करताना आपण अधिक उत्साही, आनंदी असतो. एकप्रकारे सकारात्मक वातावरण निर्माण होऊन आपली क्रयशक्ती वाढल्याची प्रचीती येऊ लागते. आपलं दैनंदिन काम करत असताना आपण नवीन व्यक्तीमत्वांचा परिचय करून घेण्याचं उद्दिष्ट साध्य केलं पाहिजे. नव्यानं परिचय झालेल्या व्यक्तींकडून आपण अनेक नवनवीन गोष्टी, संकल्पना शिकू शकतो. त्याचा एकूणच आपल्या वैचारिक प्रगल्भतेच्या वृद्धीच्या दृष्टीकोनातून खूप चांगला उपयोग होऊ शकतो. आपल्या अंतर्मनांतील विचारांना विशिष्ट दिशा, गती अथवा विषय असतीलच असं नाही. दिवसभरात

आपल्या मनांत आलेले सर्वच विचार, तसं बघितलं तर, आपल्या लक्षात देखील राहतातच असं नाही. ह्या विचारमंथनात आपल्याला वर्तमानातील वास्तवाचं भान राहणं महत्वाचं असतं. पण भूतकाळाच्या साठवणीतील आठवणीत रमलेल्या आपल्या अंतर्मनाला दुसरीकडे भविष्याची काळजी, चिंता करायची देखील सवय जडलेली असते. आजचा दिवस माझा, ह्या भावनेतून, दृष्टीकोनातून आपले विचार, वर्तन आणि व्यवहार होण्याची जाणीव होत राहणं महत्वाचं ठरतं.



आधुनिक केसरी

## चैतन्याचे वर्म | पांडुरंग ||

ज्याच्या त्याच्या हाती | आपुला सन्मान ||
अंती समाधान कर्म देते ||१||
सकरात रूजे | सुखाचा अंकुर ||
मायेची फुंकर | संत घाली ||२||
नकारी विचार | आयुष्या जाळती ||
दुःखाला भरती | क्षणोक्षणी ||३||
घातकी विकार | साधनेत बाधा ||
हरिनाम साधा | वेळोवेळी ||४||
नाम कर्म धर्म | व्हावा तो स्वधर्म ||
चैतन्याचे वर्म | पांडुरंग ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

उत्कृष्टां सहजां भक्तिं देहि कल्याणि मे सदा | धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम् || ८६ || हे कल्याणी, उत्कृष्ट आणि सहज अशी तुझी भक्ती मला सदा दे. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

ब्रह्मविद्या उर आवते, कम्प प्रफुल्लित गात ।
कमल चक्र सब खीलते, ज्ञान उदय परभात
।।४२।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल प्रथम अध्याय)
०४/०१/४२


मेळ भाष्याचा मराठी अनुवाद :
ब्रह्मविद्येच्या प्रारंभी ज्ञान प्रगट होऊन ह्दयात आल्यावर सर्व शरीर विकसीत होऊन हलू लागते आणि शरीरांतर्गत सर्व चक्रे फुलू लागतात. विहंगम योगाच्या प्रारंभीक अवस्थेत ही क्रिया होत असते.

..................................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## आत्मदर्शन

आधुनिक केसरी





सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

साधक पणातून सिध्दावस्था प्राप्त होते स्वस्वरूप अवस्थेमध्ये देहाचे व्यापार थांबत नाहीत ते सतत चालूच असतात. ऊदा, आपल्याला झोपेत स्वप्न पडते. ते झोपेच्या अवस्थेत खरे आहे असे वाटते. ती अवस्था फक्त स्वप्नापूर्तीचं मर्यादित असते. परमार्थाचे अंतरंग सदासर्वकाळ आत्मस्वरूपाशी मनाने चिकटून रहाणे हे संत महंतांचे प्रधान लक्षण आहे.ते लोकांच्यात असुनही लोकांच्या पासून निराळे असतात. आत्मस्वरूपाच्या दर्शनात राहिल्याने त्यांना प्रपंचाची काळजी मुळी रहातचं नाही.स्वस्वरूपाच्या चिंतनात असल्याने प्रापंचिक यातना होत नाहीत.


साधक अवस्थेतूनचं सिध्दावस्था प्राप्त होते.

हे याठिकाणी लक्षात येते.

## परमेश्वराच्या भक्तीचा राजमार्ग

आधुनिक केसरी

परमात्म्याची ज्याने ओळख होते ते ज्ञान. अन्य ज्ञान ते केवळ शब्दांचे अवडंबरच होय. परमात्मा नुसत्या ज्ञानाने ओळखता येणार नाही. भक्ति केल्यानेच तो ओळखता येईल. जसे गाय आली म्हणजे तिच्यामागोमाग वासरू येते, त्याला निराळे बोलवावे लागत नाही. त्याप्रमाणे, भक्ति केल्यावर ज्ञान आपोआपच मागे येते. आता भक्ति कशी करायची हे पाहिले पाहिजे. जो देवापासून विभक्त राहात नाही तो भक्त. नुसते देहाला कष्ट दिल्याने वैराग्य प्राप्त होत नाही, तर ज्या स्थितीत आपल्याला देव ठेवील त्या स्थितीतच आनंदाने राहणे म्हणजे वैरागी होणे. सुखात ठेवले तर आसक्तिशिवाय राहिले म्हणजे झाले. वैराग्य प्राप्त व्हायला प्रपंच सोडावा लागत नाही. साधुसंत प्रपंच सोडून राहात नाहीत. किंबहुना, ते आपल्यापेक्षांही प्रपंच उत्तम करतात; पण मनातून त्यांना त्यात आसक्ति नसते. मनाने आतून जो आसक्तिरहित झाला त्यालाच खरे वैराग्य आले असे होते. अंगाला राख फासून राहिले म्हणजे वैराग्य येत नाही; तर देह प्रारब्धावर, भगवंताच्या भरवंशावर टाकून राहणे हेच वैराग्य. कशाचीही हाव न धरता, जी स्थिती प्राप्त होईल तीतच आनंदाने राहणे म्हणजे परमेश्वराची इच्छा मानणे होय. आणि तसे राहिले म्हणजे आपोआपच भक्त होतो. तसे व्हायला राजमार्ग म्हणजे नामस्मरण करणे. नामस्मरणावर विश्वास ठेवावा आणि ते विश्वासाने घेत जावे. गुरूने जे नामस्मरण करायला सांगितले असेल तेच करीत राहावे. आणि त्यातच त्याला पाहावे, म्हणजे दिसेल ते गुरुरूपच दिसू लागते. असे झाले म्हणजे सर्व ठिकाणी गुरू दिसू लागतो;



चांगल्या दिवाणखान्यात असलो म्हणजे गुरू दिसतो आणि वाईट ठिकाणी असलो तर तो दिसत नाही असे नाही. सर्व ठिकाणी गुरुरूप दिसू लागल्यावर जगात वाईट असे काहीच राहात नाही, कारण मग वाईटाला जागाच राहात नाही. नामस्मरण हेच साधन आहे आणि साध्यही तेच आहे. दुसऱ्या कुणीही काहीही सांगितले तरी त्यावर विश्वास ठेवू नये. नामस्मरण हेच सत्य. त्यावर इतका विश्वास ठेवा, की त्याशिवाय जगात दुसरे काही नाही. एवढा विश्वास अंगी बाणल्यावर देव काही लांब नाही, तुमच्याजवळ आहे. प्रपंचावर जी आसक्ति करता ती तिथून काढून परमार्थावर ठेवा, म्हणजे परमार्थ कठीण नाही. गुरूला अनन्य शरण जाणे म्हणजेच आपला मीपणा नाहीसा करणे होय. मीपणा समूळ मेल्याशिवाय अनन्य शरण जाता येणार नाही. मीपणा हा गुरूने सांगितलेले नामस्मरण करीत राहिल्याने जातो. म्हणूनच सतत नामस्मरण करीत असावे.

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

गुरुआज्ञेपरते दुसरे त्याला साधनच नसते. तोच परमार्थ, आणि तीच त्याची तीर्थयात्रा होते. आणखी काही करायचे आहे असे त्याच्या ध्यानीमनीही येत नाही. अत्यंत चिकाटीने संतांचा समागम करावा, आणि त्यांच्या कृपेस पात्र व्हावी. प्रारब्धाची आणि ग्रहांची गती देहापर्यंतच आहे, मनाने भगवंत भजायला त्यांची आडकाठी नाही. जो संताची किंवा सद्गुरूची आज्ञा पाळतो, त्याचे प्रारब्ध हे प्रारब्धरूपाने राहात नाही. भगवंताच्या अनुसंधानाची सवय लावून घ्यावी, म्हणजे आपण प्रारब्धावर विजय मिळवल्यासारखेच आहे.भगवंताचा जो झाला ।त्याला देह प्रारब्धावर टाकता आला ॥कोणत्याही मंगल कार्यात सर्वा आधी गणपतीचे आवाहन करतात, आणि सगळे कार्य संपले की सर्वांचे शेवटी त्याचे विसर्जन करतात. त्याच प्रमाणे अनुसंधानानेच पोथीला सुरुवात करावी आणि अनुसंधानानेच पोथीची समाप्ती करावी.

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

धालें मग पोट ।केला गड्यांनी बोभाट ॥१ ॥
ये रे ये रे नारायणा ।बोलों अबोलण्या खुणा ॥ध्रु.॥
खांद्यावरी भार ।तीं शिणती बहु फार ॥२ ॥
तुकयाच्या दातारें ।नेलीं सुखी केलीं पोरें ॥३ ॥
पाहाती गौळणी ।तंव पालथी दुधाणी ॥१ ॥
म्हणती नंदाचिया पोरें ।आजि चोरी केली खरें ॥ध्रु.॥
त्याविण हे नासी ।नव्हे दुसरिया ऐसी ॥२ ॥
सवें तुका मेळा ।त्याणें अगुणा आणिला ॥३ ॥
आतां ऐसें करूं ।दोघां धरूनियां मारूं ॥१ ॥
मग टाकिती हे खोडी ।तोंडीं लागली ते गोडी ॥ध्रु.॥
कोंडूं घरामधीं ।न बोलोनि जागों बुद्धी ॥२ ॥

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे



शेतकऱ्यांचं जीवनमान उंचावण्यासाठी

पान ६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

सोमवार, ११ सप्टेंबर २०२३



आरक्षणावरुन मराठा-कुणबी आमनेसामने

पान ७


# पावसासाठी मुस्लिम बांधवांकडून नमाज

## सोलापुरात पिकांना वाचवण्यासाठी शेतकऱ्यांचे शर्थीचे प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज



**सोलापूर :** राज्यातील अनेक भागात पावसाने दडी मारली आहे. त्यामुळे राज्यातील काही भागात सध्या दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. सोलापुरात देखील सध्या दुष्काळसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळं पावसासाठी आज मुस्लिम बांधवांतर्फे विशेष नमाज पठण करण्यात आलं. अहले हदिस संघटनेतर्फे सोलापुरातील रंगभवन ईदगाह येथे पावसासाठी या विशेष नमाजचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शेकडो मुस्लिम बांधवानी उपस्थित राहून पावसासाठी प्रार्थना केली.
जेव्हा दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होते, तेव्हा असा एकत्रित नमाज अदा केला जातो मुस्लिम बांधवांच्या या नमाजला 'नमाजे इस्तेस्का' असं म्हटलं जातं. जेव्हा दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होते, त्यावेळी खुल्या मैदानात एकत्रित येऊन ही नमाज अदा केली जाते. तसेच क्षमायाचना करत अल्लाहकडे पावसासाठी दुआ केली जाते. सोलापूर जिल्ह्यात पावसानं चांगलीच ओढ दिली आहे. त्यामुळं शेतकरी चिंतेत आहेत. कारण खरीपाची उभी पिकं वाया जाण्याच्या मार्गावर आहेत. बहुतेक शेतकऱ्यांची पिकं करपू लागली आहेत. मंगळवेढा, सांगोला, बार्शी, अक्कलकोट, दक्षिण आणि उत्तर सोलापूर, मोहोळ या तालुक्यांतील पिकांना पावसाअभावी सर्वाधिक फटका बसला आहे.
यंदा जिल्ह्याचे गळीतधान्य, अन्नधान्य आणि कडधान्यांचे उत्पादन घटणार आहे. आता पिकांना वाचवण्यासाठी शेतकऱ्यांचे शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. पाऊस नाही, उजनीतून पाणी सोडले जात नाही. त्यामुळं शेतकऱ्यांसमोरील अडचणींचा डोंगर वाढला आहे.
पुणे जिल्ह्यातून धरणातून उजनी धरणात विसर्ग सुरु दरम्यान, पावसाळ्याच्या अखेरच्या टप्प्यात पुणे जिल्ह्यात पाऊस सुरु झाला आहे. पुणे जिल्ह्यातील चासकमान, वडीवळे, पवना, आंध्रा आणि कासार साई या धरणातून 20 हजार क्युसेकने पाणी सोडण्यास सुरुवात झाली आहे. यातच उजनीच्या पाणलोट क्षेत्रात सुरू झालेल्या पावसामुळे पाच हजार क्यूसेक विसर्गने पाणी लवकरच उजनी धरणात येण्यास सुरुवात होणार आहे. अजूनही पुणे जिल्ह्यात पाऊस सुरु असल्याने उजनी धरणात येणारा विसर्ग वाढू शकणार आहे. सध्या उजनी धरणामध्ये 18 टक्के जिवंत पाणी साठा असून धरणात 73.33 टीएमसी एवढा पाणीसाठा आहे.



# विजय भोईर यांनी केला रवी भोईर यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मान्यतेने उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांची घोषणा केली आहे.यामध्ये जिल्हा सरचिटणीस, उपाध्यक्ष, चिटणीस, कोषाध्यक्ष, विविध मोर्चाचे जिल्हाध्यक्ष, आघाड्यांचे जिल्हा संयोजक तसेच नऊ मंडलांचे अध्यक्ष यांचा समावेश आहे. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.उरण तालुक्यातील भाजपचे निष्ठावंत व प्रामाणिक कार्यकर्ते रवी भोईर यांची उरण मंडळ अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे. पोलीस स्टेशन मध्ये कोणीही गरीब किंवा पीडित व्यक्ती असेल तर त्याला सहकार्य करतात. कार्यकर्त्यांना काम करण्याचे प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन करतात. पदाधिकारी, कार्यकर्ता, जनतेसाठी चोवीस तास कार्यरत असणारा नेता म्हणून रवि भोईर यांची ओळख आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत तसेच त्यांची निवड उरण मंडळ अध्यक्ष पदी झाल्याने जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर यांनी शाल, श्रीफळ, संत तुकाराम महाराजांची मूर्ती देऊन त्यांचा सत्कार केला.

# भंडाऱ्यात येणाऱ्या उद्योग मंत्र्यांना काळे झेंडे दाखविणार

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** जिल्ह्यात आढावा बैठकीला येणाऱ्या उद्योग मंत्री उदय सामंत यांना भंडारा ओबीसी क्रांती मोर्च्याचा रोषाला सामोर जावे लागणार आहे. राज्य सरकारने मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात समाविष्ट करत कुणबी समाजाचे दाखले देण्याची भूमिका घेतल्यास भंडाऱ्यात येणारे शिंदे सरकारचे मंत्री उदय सामंत यांना ओबीसी क्रांती मोर्च्याच्या वतीने काळे झेंडे दाखवत निषेध करणाचा निर्धार केला आहे.
ओबीसी क्रांति मोर्चा संस्थापक अध्यक्ष संजय मते यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. विशेष म्हणजे मराठा समाजाला ओबीसीच्या कोट्यातून आरक्षण दिल्यास वैनगंगा नदीत उडी घेऊन सामूहिक आत्महत्या करू, असा इशारा ओबीसी क्रांती मोर्चाकडून याआधीच देण्यात आला आहे. या संघटनेने शिंदे-फडणवीस-पवार सरकारच्या विरोधात एल्गार पुकारल्याचे दिसत आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाचा पेटलेला वाद सध्या तरी मिटेल, असे दिसत नाही. या इशाऱ्याने भंडारा पोलीस विभागासह जिल्हा प्रशासनाचे पुन्हा टेंशन वाढले आहे.
मराठा नेते मनोज जरांगे यांचे उपोषण सोडवण्याचा पुरेपूर प्रयत्न सरकारकडून केला जात आहे. पण त्यात यश येताना दिसत नाही. दरम्यान मराठा समाजाला कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याची घोषणा मुख्यमंत्री शिंदे यांनी केल्यानंतर ओबीसी पेटून उठला आहे. राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनी या निर्णयाला आधीच विरोध केला आहे. आता यामध्ये भंडारा ओबीसी क्रांती मोर्चाने उडी घेतली.



# शिर्डीला जाणाऱ्या साई दिंडीचे पिशोर येथे जोरदार स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** महाराष्ट्र राज्यात भरपूर पाऊस पडू दे,बळीराजा सुखाऊ दे,नदी,नाले,ओढे तुडुंब भरू दे,धन धान्याच्या राशी बळीराजाला लाभू दे ,राज्यातील जनतेला आरोग्य लाभू दे अशी साई चरणी प्रार्थना करण्याची विनंती वैजापूर च्या साई भक्तांनी पिशोर (ता,कन्नड) येथून शिर्डीला जाणाऱ्या पायी दिंडीतील भक्त भाविकांना रविवार(ता.१०)रोजी लक्ष्मी नारायण लॉन येथे साई दिंडी थांबली असता केले. साईभक्त सतीश वर्मा यांनी या दिंडीतील भक्तांना महाप्रसाद जेवण दिले. साई भक्त राजेंद्र लालसरे, सुधीर लालसरे, गौरव दौंडे, मेठल पोकर्णे, रोहित जोशी, दशरथ बनकर, स्वप्नील जेजुरकर, गिरीश भालेराव, बद्री जेजुरकर, साई भक्त धोंडीरामसिंह राजपूत, पोंदे, भाऊलाल सोमासे यांनी या साई भक्तांना शिर्डीला जाण्यासाठी निरोप दिला.

# यंदा मराठा क्रांती आरक्षण मोर्चात गगनभेदी घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** सहा वर्षांपूर्वी बुलढाण्यात जंगी मोर्चा निघाला होता. यानंतर आता बुलढाण्यात १३ सप्टेंबरला सकल मराठा समाजाच्या वतीने विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. 'तो' मोर्चा मूक होता मात्र यंदाच्या मोर्च्यात गगनभेदी घोषणा देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील १३ तालुक्यात उपोषण, निवेदन देऊन मोर्च्याला पाठबळ देतांनाच वातावरण निर्मिती करण्यात येत आहे.
मागील वेळी निघालेला क्रांती मोर्चा पूर्णतः मूक होता. मागण्यांसाठी समाजिक सागर उसळला मात्र एक घोषणा देखील दिली गेली नाही.



मूक राहून समाज हुंकार भरत होता. समन्वय समितीने बुधवारच्या मोर्च्यासाठीच्या घोषणा निर्धारित केल्या आहे. एक मराठा लाख मराठा या बहुचर्चित घोषणेला यंदा 'जय जिजाऊ, 'जय शिवराय' या मुख्य घोषणेची जोड राहणार आहे. याशिवाय 'आरक्षण आमच्या हक्काचं नाही कुणाच्या बापाचं', "मराठ्यांना आरक्षण मिळालेच पाहिजे', 'अंतरवाली घटनेचा तीव्र निषेध' या घोषणाही देण्यात येणार आहे.
जिल्ह्याच्या सर्वच भागातून मोर्चेकरी येणार असल्याने ठिकठिकाणी 'पार्किंग' ची व्यवस्था देखील करण्यात आली आहे. अजिंठा धाड रोडवरून येणाऱ्यांसाठी कृषी उत्पन्न बाजार समिती, मोताळा- मलकापूर मार्गाने येणाऱ्यांसाठी गुलाबचंद नगर तसेच चिखली मेहकर वरून येणाऱ्यांसाठी जिजामाता महाविद्यालय व शासकीय डीएड कॉलेजच्या प्रांगणात पार्किंग राहणार आहे. शहरातील लोकांसाठी कवीदीप हॉस्पिटल जवळ व्यवस्था उभी करण्यात आली आहे.

# नवेगावात आढळले दुर्मिळ फुलपाखरू

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** सप्टेंबर महिना 'बिग बटरफ्लाय मन्थ' म्हणून साजरा केला जातो. या महिन्याच्या निमित्ताने अर्जुनी मोरगाव तालुक्यातील नवेगावबांध राष्ट्रीय उद्यानातील फुलपाखरांच्या सर्वेक्षणात उद्यानाच्या जांभळी गेटजवळ दुर्मिळ मंकी पजल बटरफ्लाय (राथिंडा अमोर) प्रथमच येथील संशोधकांना सापडले. जैवविविधता अभ्यासक व स्थानिक एस. एस. जायस्वाल महाविद्यालयाचे सहयोगी प्रा. डॉ. गोपाल पालीवाल, धाबेपवनीचे प्रा. भीमराव लाडे, प्रा. डॉ. सुधीर भांडारकर यांनी प्रथमच या दुर्मिळ फुलपाखराची माहिती दिली. यापूर्वी या फुलपाखराची नोंद भारतातील दक्षिण आणि पूर्वेकडील राज्ये केरळ, कर्नाटक, आंध्रप्रदेश, ओडिशा, तामिळनाडू, छत्तीसगड, गोवा, पश्चिम बंगाल, बिहार आणि महाराष्ट्रातही डॉ. टिपले व डॉ. भागवत यांनी याचवर्षी केली आहे. नवेगावबांध राष्ट्रीय उद्यान हे महाराष्ट्राच्या पूर्व विदर्भात कोरड्या मिश्र जंगलापासून पावसाच्या जंगलापर्यंतच्या वनस्पतींमधील विविधतेसाठी प्रसिद्ध आहे. हे दक्षिणेकडील उष्णकटीबंधीय जंगल वन्यजीवांनी समृद्ध आहे आणि मध्य भारतातील एक महत्त्वाचे संरक्षण घटक आहे. नवेगाव राष्ट्रीय उद्यानात विविध कुटुंबांतील सुमारे ७० प्रजातींची फुलपाखरे यापूर्वीच दिसली आहे. मंकी पजल बटरफ्लाय हे लाइकेनिड कुटुंबातील एक आकर्षक फुलपाखरू आहे.

## परराष्ट्र मंत्र्यांचा संताप

आधुनिक केसरी

नवी दिल्लीमध्ये सुरू असलेल्या जी-२० शिखर परिषदेच्या पहिल्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्ली जाहीरनामा सर्वानुमते स्वीकारण्यात आल्याची महत्त्वाची घोषणा केली. गेल्या काही दिवसांपासून या जाहीरनाम्याच्या मसुद्यावर सहमती होत नव्हती. मात्र, भारताच्या राजनैतिक अधिकाऱ्यांनी अखेरपर्यंत केलेल्या प्रयत्नांना यश आले. जाहीरनाम्याच्या मसुद्यात सात वेळा युक्रेनचा उल्लेख आला आहे. गेल्यावर्षी झालेल्या बाली परिषदेतील चर्चेचे स्मरण करून, युक्रेनमध्ये सर्वसमावेशक, न्याय्य आणि टिकाऊ शांतता प्रस्थापित करण्याचे आवाहन करण्यात आले. यावरून टीका केली जात आहे. बाली जाहीरनामा आणि दिल्ली जाहीरनाम्याबाबत होणारी तुलना परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी फेटाळऊन लावली आहे. जयशंकर पत्रकार परिषदेत म्हणाले, दिल्ली जाहीरनाम्याची बाली घोषणेशी तुलना करताना, मी फक्त एवढेच म्हणू शकतो की बाली बाली होती आणि नवी दिल्ली ही नवी दिल्ली आहे. वर्षभरापूर्वीच बालीची परिस्थिती वेगळी होती. तेव्हापासून अनेक गोष्टी घडल्या आहेत. दिल्ली घोषणापत्र आताच्या परिस्थितीवर आधारित आहे, ज्याप्रमाणे बाली घोषणापत्र त्यावेळच्या परिस्थितीवर आधारित होता. दिल्ली जाहीरनाम्या आजच्या समस्यांवर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत, ज्याप्रमाणे बाली जाहीरनाम्यात त्यावेळच्या समस्यांवरील प्रश्न मांडले गेले, असे स्पष्टीकरण त्यांनी दिले. नेत्यांच्या घोषणेच्या भू-राजकीय विभागात एकूण ८ परिच्छेद आहेत. त्यापैकी ७ प्रत्यक्षात युक्रेनच्या मुद्द्यावर केंद्रित आहेत. त्यापैकी बरेच समकालीन मुद्दे महत्त्वाच्या समस्यांवर प्रकाश टाकतात. त्यामुळे कोणीही याविषयी धार्मिक दृष्टिकोन बाळगू नये, असंही जयशंकर म्हणाले. जयशंकर म्हणाले, 'जी-२० शिखर परिषदेच्या विविध निकालांना चीनचा खूप पाठिंबा आहे. त्यांना कोणत्या स्तरावर प्रतिनिधित्व द्यायचे हे प्रत्येक देशाने ठरवायचे आहे. मला वाटत नाही की कोणीही याचा सखोल अर्थ काढावा. जाहीरनाम्याच्या मसुद्यात चार वेळा युक्रेनचा उल्लेख आला आहे. बाली परिषदेतील चर्चेचे स्मरण करून, युक्रेनमध्ये सर्वसमावेशक, न्याय्य आणि टिकाऊ शांतता प्रस्थापित करण्याचे आवाहन करण्यात आले. युक्रेनच्या मुद्द्यावर संयुक्त राष्ट्रांमध्ये मंजूर करण्यात आलेल्या ठरावाचे पालन करावे, असे दिल्ली जाहीरनाम्यात नमूद करण्यात आले आहे.

## पाऊस पडला तरी खरीप पिके जाणार ?



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**यंदाचा पावसाळा आला तसा गेला बघता बघता तीन महिने झाले. त्याचा पत्ताच नाही. गोकुळ आष्टमीच्या शुभ दिनी तब्बल पंचेवीस दिवसांनी खंडणा पडलेला पाऊस राज्यात चौफेर म्हणता येणार नाही पण कुठं कुठं सुरू झाला. आभाळाने महाराष्ट्र झाकला. पण त्यात दम नाही. रिमझिम पडतो किंवा डोक्याची केसं ओले होतील एवढाच पडतो. पडला तिथं मुसळधार नाही तिथं कोरडीधार असं चित्र सद्या दिसतं आहे. परतीचा पाऊस पडला तर दुष्काळाचा सामना पिण्याचे पाणी प्रश्न मार्गी लागतील पण आता पाऊस पडला तरी खरीपाची 100 टक्के पिके राखरांगोळी झाली. शेतकऱ्यांच्या पदरात काहीच पडणार नाही. ऊसाचे उत्पादन घटणार सोयाबीन कापसाची ऐशी की तैशी. त्यामुळे पडत असलेल्या पावसावर बळीराजाची चेहरे आनंदी दिसत असले तरी बाह्य अंगाने म्हणावे लागतील.**

कारण आतुन पोट करपलेलेच आहे. भयानक संकट असुन अजुनही मराठवाड्यात एकाही धरणात, प्रकल्पात, साठवण तलावात पाण्याचा थेंब आवकीचा नाही. नदी-नाले कोरडे ठणाक पडलेले दिसतात. आशा करूत पाऊस पडेल. शंभर वर्षानंतर असं चित्र पहिल्यांदाच पहायला मिळतंय. कारण पावसाळा सुरू झाला तर तब्बल जुन,जुलै,ऑगस्ट तीन महिने अपवाद वगळता कोरडे जाणं कधीच घडत नाही ते पहिल्यांदा घडलं. ऑगस्टअखेर पावसाची आशा सोडुन दिली होती पण ज्या दुष्ट कंसाचा नायनाट करण्यासाठी मथुरेत श्रीकृष्णाचा जन्म झाला त्या गोकुळ आष्टमीपासुन थोड्याफार पावसाला सुरूवात झालेली दिसते. मागच्या चार-पाच दिवसापासून आकाशात ढग भरतात. माजलगाव, बीड, आष्टी, पाटोदा, अंबाजोगाई, वडवणी, धारूर, केज आदी तालुक्यात रिमझिम का होईना? पडला. पण नेहमीसारखा मुसळधार तर बाजुलाच सोडा असा पडलाच नाही. अन्य विभागात उदा. नाशिक, नागपूर मुसळधार पाऊस पडत असल्याचा आनंदच आहे पण मराठवाडा मात्र दुष्काळाच्या उंबरठ्यावर उभा राहिला अशी परिस्थिती सद्या तरी दिसते. विशेष म्हणजे परतीचा पाऊस पडणं खुपच महत्वाचं वाटतं. कारण खरीप हंगाम जरी हातुन गेला तरी रब्बीला त्याचा फायदा होईल. जनावरांचा चारा वाढ होवु शकते ज्यामुळे तो प्रश्न गंभीर बनणार नाही. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे नदी, नाले, ओढे, तळे भरतील. पण हे कधी पाऊस पडला तर? वर्तमान स्थिती चिंताजनकच म्हणावी लागेल. आकाशात भरल्या पानाचे ढग येतात. थंडगार हवा सुटली. असं वाटतं की आता मुसळधार पाऊस पडेल पण त्याने चालवलेली थट्टा खऱ्या अर्थाने काळजीच म्हणावी लागेल. कारण आकाशात ढग आले त्यातुन पाऊस पडतोच. हे चित्र पहिल्यांदाच पहायला मिळतं की आकाशात ढग आले तरी वरचेवर जिरून जातात पाऊस पडत नाही. खरीप पिकाची सद्यस्थिती पहायची झाली तर हालक्या जमिनीवरचे पिकं उदा. डोंगरमाथ्यावरील मग सोयाबीन, कापुस इतर कडधान्ये सद्यस्थितीत 100 टक्के नष्ट झाली.सुपिक जमिनीवर ज्याला आपण गंगथडी विभाग गोदाकाठ किंवा काळ्या मातीच्या जमिनी. इथं मात्र खरीपाची पिके पडत असलेल्या पावसाने जीवदान थोडंफार मिळाल्यासारखं वाटतं पण उत्पादनावर मात्र 100 टक्के परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाही. कारण ऑगस्टमध्ये पडलेला पाऊस त्या पिकाचा उत्पादनाचा भर असतो. पण यंदा पाऊस पडला नाही.



कंबरडे खरीप पिकाचे मोडलं आणि आता पाऊस पडला तरी शक्य नाही. एकुणच परिस्थिती भयानक असून पडत असलेल्या पावसावर आनंद घेण्याचं कारण मुळीच नाही. प्रसारमाध्यमे किंवा हौशागौशांनी अमुक भागात पाऊस पडला, तमुक भागात मुसळधार पाऊस अशा बातम्या देणं म्हणजे कदाचित विमा कंपन्यासाठी पोषक वातावरण असतं. नुकसान मात्र शेतकऱ्याचं होतं. याची काळजी देखील घेणे महत्वाचे. कारण सुदैवाने समजा पाऊस पडला पण तोपर्यंत झालेलं नुकसान भरून निघत नाही. खरीपाचं उत्पादन खऱ्या अर्थाने जुन-जुलैमध्ये पडणाऱ्या पावसावर आधारीत असतं. पिक वाढीसाठी नक्षत्रानुसार पडलेला पाऊस पिकाचा भराव होण्यासाठी महत्वाचा ठरतो. पण यंदा असं काही झालं नाही. तब्बल तीन महिने पाऊसच पडला नाही. विशेषतः बीड जिल्ह्यात तर एक-दोन पावसाचा अपवाद वगळता मोठे पाऊस झालेच नाहीत. असं एकही जिल्ह्यात उदाहरण नाही की अमुक नदीला यंदाच्या पावसाळ्यात पुर आला. नद्या सोडा नाल्यासुद्धा भरून वाहिल्या नाहीत. शेतातले ओढे आजही कोरडेठणक पडलेले असुन डोंगरदऱ्यातील साठवण तलाव थेंबसुद्धा नाही. त्यामुळे मोठे पाऊस होणे अत्यंत महत्वाचं वाटतं. हवामान खात्याने सांगितलेल्या भविष्यानुसार परतीचा पाऊस पडेल असं वाटतं. पण यंदा शासनाचे हवामान खाते असतील किंवा अभ्यासक पंजाब डक असतील सर्वांचे अंदाज ज्याच्या दांड्या निसर्गाने उलथ्या करून टाकल्या. कुणाचेही अंदाज दिलेल्या तारखेला खरंच ठरले असं म्हणता येत नाही. एक गोष्ट निश्चित होईल की खरीप जरी हाताला लागले नाही तरीही दुष्काळाचा सामना करावा लागणार नाही म्हणून परतीचा पाऊस मोठ्या प्रमाणावर पडणं अत्यंत महत्वाचं दिसतं. अजुन नक्षत्र बाकी आहेत. गणरायाचं आगमन देखील राहिलेलं आहे. ज्या पंधरवाड्यात पाऊस पडतच असतो पण दुसरीकडे शेतकऱ्यांचा बैलपोळा जवळ येवु लागला आणि पोळा झाल्यानंतर पाऊस भोळा होतो, अशी एक म्हण आहे. पण यंदा मुळातच पावसाळा भोळाच होवुन राहिलेला दिसतो. एकुण परिस्थिती पहाता परतीचा पाऊस पडेल अशी प्रार्थना आपण परमेश्वराकडे करू पण शेतकऱ्यांच्या दृष्टीने बघायचं झालं तर पाऊस पडला तरी खरीप पिकाचा खडकू देखील हातात मिळु शकत नाही. कारण उत्पादन 100 टक्के गेल्यात जमा आहे. आठ दिवसापुर्वी लोकांची चेहरे कालवंडली होती. थोड्या फार पावसाने पुन्हा फुललेले दिसते. त्यामुळे बाजारपेठेत पुन्हा राम राम शाम शाम होवु लागले. आपल्याकडच ही परिस्थिती आहे का? त्यापेक्षा काल परवा कर्नाटक राज्यात फिरण्याचा योग आला तेव्हा तिकडे देखील खरीप पिकाची उगवण होईल एवढी सुद्धा क्षमतेचा पाऊस पडलेला नाही. असो. वर्तमान परिस्थितीत वरूण राजाने कृपा केली तर खुप काही चांगलं म्हणावे लागेल. पाऊस पडु दे म्हणुन परमेश्वराकडे प्रार्थना करू पण जर पडलाच नाही तर मग 100 वर्षे असा दुष्काळ पडला नसेल त्यापेक्षा कठोर दुष्काळाचा सामना मराठवाड्यातल्या जनतेला करावं लागेल हे निश्चित. सरकारने देखील उपाययोजना हाती घ्याव्यात. शेतकऱ्यांचा विमा असेल किंवा इतर अनुदान असेल या विषयात प्राधान्य देवुन संकटात खऱ्या अर्थाने मदतीसाठी पुढे येण्याची गरज वाटते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक रूपायात विमा योजना ज्याचा फायदा प्रत्येक शेतकऱ्याने घेतला मोठ्या प्रमाणावर भरणा झाला. त्याचा फायदा देखील मिळेल यात शंका वाटत नाही. पण उर्वरीत काळात पाऊस पडणं अत्यंत महत्वाचं वाटतं. ऊस उत्पादन घटणार बीड जिल्हा हा ऊसाचं पेठार म्हणून मागच्या दहा वर्षापासुन ओळखल्या जातं. जिल्ह्यात पाच-सहा कारखाने आहेत. पण यंदा पावसाअभावी ऊसाच्या उत्पादनात मोठी घट होवु शकते. परिणामी कारखानदार अडचणीत येतील. संपूर्ण देशातच उत्पादनात घट होणार अशा बातम्या येवु लागलेल्या असताना मराठवाड्यात देखील तिच परिस्थिती समोर येत आहे. आता पाऊस पडला तरी देखील उत्पादन घटणार हे मात्र नक्की. सद्यस्थितीत दहा-बारा कांड्यावर ऊस आहेत. कारखानदारांनी गाळपाच्या तयारीला सुरूवात केलेली दिसते.

## विश्वचषकासाठी संतुलित संघ निवड



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**५ ऑक्टोबर ते १९ नोव्हेंबर या कालावधीत आपल्याच देशात एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा होणार असून या स्पर्धेपसाठी निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी ४ तारखेला १५ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. या संघात रोहित शर्मा व युवा शुभमन गिल हे भारताचे अनुभवी आणि युवा खेळाडू भारताच्या डावाची सुरवात करतील. तर मधल्या फळीची जबाबदारी विराट कोहली, सुर्यकुमार यादव, श्रेयस अय्यर तसेच यष्टीरक्षक ईशान किशन यांच्यावर टाकण्यात आली. अनुभवी के एल राहुल या आणखी एका अतिरिक्त यष्टीरक्षकाला संधी देण्यात आली आहे.**

विशेष म्हणजे हे दोघेही सलामीवीर आणि फिनिशर म्हणूनही जबाबदारी पार पाडतात. भारताची फलंदाजी अतिशय बलवान असून रोहित, शुभमन व विराट हे पहिल्या तीन क्रमांकाचे फलंदाज जगातील सर्वोत्तम फलंदाज मानले जातात. विशेष म्हणजे तिघेही चांगल्या फॉर्ममध्ये आहेत. आशिया चषकात हे तिघेही चांगली कामगिरी करत आहेत. नेपाळ विरुद्ध रोहित आणि शुभमनने नाबाद अर्धशतकी खेळी केली आहे. विराट तर जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. गेल्या काही महिन्यांपासून विराट पुन्हा लयीत आला असून त्याने काही शतके झळकावून प्रतिस्पर्धी गोलंदाजांना इशारा दिला आहे. तो फॉर्मात आल्याने विश्वचषक जिंकण्याच्या भारताच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. चौथ्या क्रमांकावर युवा श्रेयस अय्यर येईल. दुखापतीतून तो सावरला असून भारताचा तो भरवशाचा फलंदाज आहे .तो फ्लॉप गेला तर त्याची जागा मिस्टर ३६० सुर्यकुमार यादव घेईल. तो मैदानात सर्वत्र फटकेबाजी करू शकतो. तोही भारताचा भरवशाचा फलंदाज मानला जातो. त्यानंतर ईशान किशन किंवा के एक राहुल हे यष्टीरक्षक फलंदाज मैदानात येतील दोघेही स्फोटक फलंदाज असून मॅच फिनिशर आहेत. कमी चेंडूत जास्त धावा काढून संघाला विजय मिळवून देण्यात दोघांचाही हातखंडा आहे. त्यानंतर हार्दिक पांड्या हा जगातील सध्याचा सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडू येईल. तो गोलंदाजी, तडाखेबंद फलंदाजी आणि प्रभावी क्षेत्ररक्षण करून संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावतो. त्याने आपल्या अष्टपैलू खेळीने भारताला अनेक विजय मिळवून दिले आहेत. शार्दूल ठाकूर हा आणखी एक अष्टपैलू खेळाडू भारतीय संघात आहे. मध्यमगती गोलंदाजी आणि तडाखेबंद फलंदाजी हे त्याचे वैशिष्ट्ये आहे. गोलंदाजीमध्ये निवड समितीने तीन फिरकी गोलंदाजांना संधी



दिली असून अनुभवी रवींद्र जडेजा सोबत फॉर्मात असलेला चायनामन गोलंदाज कुलदीप यादव आणि लेफ्ट आर्म स्पिनर अक्षर पटेल यांना संधी मिळाली आहे. तिघेही डावखुरे मंदगती गोलंदाज आहेत त्यामुळे मंदगती गोलंदाजीत विविधता नसल्याची टीका टीकाकार करीत असले तरी तिघेही फॉर्ममध्ये आहे. जडेजा हा भारताचा सर्वोत्तम मंदगती गोलंदाज आहे शिवाय तो फलंदाजीही करतो आणि चांगला क्षेत्ररक्षक आहे म्हणजे तो एक उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू आहे. कुलदीप यादव जरी डावखुरा असला तरी ती चायनामन गोलंदाज आहे आणि विशेष म्हणजे तो फॉर्ममध्ये आहे. फॉर्ममध्ये असलेल्या खेळाडूला संधी देणे केंव्हाही चांगले. अक्षर पटेल गोलंदाजीसोबत फलंदाजीही करू शकतो त्याची फलंदाजी भारतासाठी बोनस ठरेल. जसप्रीत बुमराह व मोहम्मद शमी या अनुभवी वेगवान गोलंदाजांसोबत मोहम्मद सिराज या युवा गोलंदाजाला देखील निवड समितीने संधी दिली आहे. निवड समितीने एखाद्या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाला संधी द्यायला हवी होती असे वाटते कारण जगातील सर्वच संघात एक तरी डावखुरा वेगवान गोलंदाज आहे असो... निवड समितीने निवडलेला हा संघ देखील चांगला आहे. जुन्या आणि नव्या खेळाडूंना संधी देत जोश आणि होश यांचे संतुलन साधण्याचा प्रयत्न निवड समितीने केला आहे त्यात ते बऱ्यापैकी यशस्वीही ठरले आहेत. विश्वचषकासाठी निवडण्यात आलेला हा संघ संतुलित आहे हे मान्य करून नीवड समितीचे याबाबत अभिनंदन करावे लागेल. आता जबाबदारी आहे ती निवडण्यात आलेल्या या १५ खेळाडूंची. २०११ नंतर भारताला विश्वचषकावर नाव करण्यात अपयश आले आहे हे अपयश झटकून नव्याने सुरवात करण्याची संधी या निमित्ताने या संघाला मिळणार आहे. सर्व खेळाडू अनुभवी आहेत. एकदिवसीय सामने खेळण्याचा सर्वांना मोठा अनुभव आहे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे ही विश्वचषक स्पर्धा भारतात होणार आहे. त्यामुळे घरच्या मैदानावर देशासाठी सर्वोत्तम कामगिरी करून भारताला १२ वर्षांनंतर एकदिवसीय विश्वचषक जिंकून देण्याची जबाबदारी ते यशस्वीपणे पार पाडतील अशी आशा करूया.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# जात पडताळणी कार्यालयात दलाल सक्रिय, गरजुंची पिळवणूक

## अमोल नरवाडे यांनी दिले जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** जिल्हा जात पडताळणी कार्यालयात दलालांचा सुळसुळाट वाढला असून, काही दलाल अधिकाऱ्यांशी संगणमत करून जाणीवपूर्वक कागदपत्रात त्रुटी काढत आहेत. त्यामुळे गरजूंना दलालांचा सहारा घेतल्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. परिणामी जात वैधता प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी गरजूंची दहा ते वीस हजार रुपये किंबहुना याहूनही अधिक रक्कम दलाल उकळत आहेत. समितीने दिलेल्या अधिकारांचा काही प्रवृत्तींकडून दुरुपयोग सुरू असून यावर कठोर कारवाई करावी. अशी मागणी दयावान ग्रुपचे अध्यक्ष अमोल नरवाडे यांनी जिल्हा अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. हा गैरप्रकार न थांबल्यास सदर कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात येईल असा इशारा देखील देण्यात आला आहे.

वाशिमच्या जिल्हाधिकारी श्रीमती भुवनेश्वरी एस. यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, रिसोड तालुक्यातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी तसेच अनेकांना शासकीय नोकरीसाठी उपरोक्त विभागाचे जात वैधता प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य असते. त्यासाठी गरजूंकडून आवश्यक कागदपत्राची पूर्तता सुद्धा करण्यात येते. परंतु सक्रिय असलेले दलाल स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने, सदरील प्रकरण जाणीवपूर्वक त्रुटी मध्ये टाकून गरजूंची अडवणूक करतात. परिणामी गरजवंतांना दलालामार्फत काम करून घेतल्याशिवाय पर्याय उरत नाही. यामुळे विद्यार्थ्यांसह विविध गरजूंची आर्थिक पिळवणूक होत आहे. या गंभीर प्रकाराची त्वरित दखल घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी. व होत असलेला गैरप्रकार थांबवावा. अन्यथा, येत्या पंधरा दिवसात सदर कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात येईल. असा इशारा सुद्धा निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदन देतावेळी सरपंच संघटनेचे माजी तालुकाध्यक्ष डिगांबर जाधव, कंकरवाडीचे मा. सरपंच रामेश्वर देवकर, सेलूखडसे येथील उपसरपंच नारायण खडसे, रिसोड येथील विजय पंडित आदींची उपस्थिती होती.



आधुनिक केसरी

### लय भारी सुगरण



सौ आरती राजाराम परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

कृष्ण सुदाम्यासारखी असावी मैत्री असावी निखळ। स्वार्थाला  नसावा थारा। प्रेमाने गाठावा तळ  .आज गोकुळअष्टमी त्या निमीत्ताने खव्वयांसाठी काही तरी खास असा आजचा मेनू
मैत्री असावी तर कृष्ण सुदाम्यासारखी, भगवान कृष्णासारखा सखा असताना काय काळजी ? पण या मैत्रीचा गैरफायदा सुदाम्याने कधीच घेतला नाही तर भगवान कृष्ण पण आपल्या गरीब मित्राला कधीच विसरले नाहीत. मित्राने आणलेल्या पोह्याचा स्विकार प्रेमाने, आनंदाने करून मैत्रीरूपी झाडाला भगवान कृष्णाने जणू खतपाणी घालून डेरेदार केले. त्या भेटीचाच आज आपण गोड ,  पौष्टिक, मैत्रीरूपी लाडू, गोकुळअष्टमीचा प्रसाद म्हणून ही खास पेशकश तुम्हा सर्वांसाठी. **साहीत्य :**  दोन वाट्या पोहे (जाड ,पातळ ) घरात उपलब्ध असतील ते. एक वाटी गुळ, वेलचीपूड, सुके किसलेले खोबरे चार ते पाच चमचे, बायडींगसाठी तूप इत्यादी. **कृती :** कढईत पोहे कुरकुरीत भाजून घ्या.  किसलेले खोबरे भाजून घ्या. पोहे थोडे गरम असतानाच मिक्सरमध्ये त्याचे पीठ करुन घ्या.
आता मिक्सरमध्येच  चिरलेला गुळ त्या पोह्याच्या पीठात घालून एकत्रच पीठ दळून घ्या. ताटात काढून घ्या, त्यात भाजलेले सुके खोबरे ,वेलचीपूड घाला. बायडींगसाठी तूप घाला चार ते पाच चमचे आणि गरगरित गोल लाडू वळा. हवे असल्यास त्यात आवडीप्रमाणे ड्रायफ्रूट घालू शकता . मग करून बघा पोह्याचे पौष्टिक लाडू !!
टिप-- गुळ आणी पोह्यात लोहाचे प्रमाण अधीक असल्याने हिमोग्लोबीन वाढीसाठी खुप उपयुक्त. झटपट होणारे पौष्टिक आणी रूचकर लाडू.



सुदाम्याचे लाडू( पोह्याचे लाडू )

# बाजार सावंगी महसूल मंडळामध्ये ई-पीक पाहणीत शेतकऱ्यांकडून हलगर्जीपणा


आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी महसूल मंडळ मध्ये ई-पिक पेरा पहाणी ला शेतकऱ्यांकडून हलगर्जीपणा करण्यात येत असून मग त्यांना विमा नुकसान भरपाई कसी मिळणार असा प्रश्न तलाठी मंडळ अधिकारी यांना पडला. अस्मानी सुलतानी संकट बघता शेतकऱ्यांना सरकारने एका रुपयात विमा करुन सवलत दिली आहे. या दरम्यान स्लो नेट,नेट बंद , गर्दी ही समस्या तर आहेच परंतु असे असताना आपला पिकपेरा आपल्याच हातात या सुत्रांनुसार मोबाईल द्वारें ई-पिक पेरा पहाणी करुन सेतू केंद्राद्वारे पाठव्याचे आहे.परंतु याकडे शेतकरी कानाडोळा दुर्लक्ष हलगर्जीपणा करतांना दिसत आहे.या संदर्भात सेतू केंद्रावाले सतत सोशल मीडियावर सतत सुचना करत ई-पिकपेरा पाहणी करण्याची सुचना करत आहे.
परंतु शेतकरी त्यास गंभीरपणे घेताना दिसत नाही. जरी सरकारने एका रुपयात विमा योजना लागू केली परंतु पिक पेरा पाहणी देणार की नाही.
नसता नुकसान भरपाई कसी मिळणार?
असा प्रश्न उपस्थित होते आहे. जे असेल नसेल त्याची ई-पिक पेरा पहाणी करुन सेतू केंद्रात देवून विमा योजनेतून नुकसान भरपाई घेण्यास पात्र व्हावे असा सल्ला ही देण्यात येत आहे.तरी शेतकऱ्यांनी ई-पिकपेरा पाहणी द्यावे असी सुचना आहे.




महाराष्ट्र Business Katta









# शेतकऱ्यांचं जीवनमान उंचावण्यासाठी



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**शेती आमची माऊली आहे. तिला आपल्या आईगत जपायला हवं. परंतु आपण तिला तसं जप्त नाही व तिला त्रास देत असतो. शेती आपली माऊली. आपण तिला त्रास देतो. असं म्हटल्यास कोणी म्हणेल की लेखक महाशय असं का बोलतात? आपण खरंच शेतीला त्रास तरी देतो काय? तर याचं उत्तर होय असंच आहे आणि ते खरंही आहे. आपण त्रासच देत असतो शेतीला. शेतीला गृहीत धरुन आपण कोणता बरे त्रास देतोय? याचं उत्तर देतांना मी एवढंच म्हणेल की आपण आपल्याला भरघोस उत्पादन यावं म्हणून शेतीत रोपांवर किटकनाशक फवारतो. त्यातच रासायनिक सल्फेटांची मात्रा टाकतो. ते रासायनिक सल्फेट, ज्यानं आपली शेतीमाऊली वांझ होते. तिची प्रतिकारशक्ती घसरते. ती प्रतिकारशक्ती एवढी घसरते की ती आपल्याला त्यानंतर उत्पादन देत नाही.**

अर्थातच मग आपण आपल्या शेतीत कितीही रासायनिक सल्फेट टाकलं, तरीही पीकपाणी होत नाही. हीच पद्धत शेतीला दुखदायक ठरते. कारण या पद्धतीनं शेतीच्या कोशिका मृत पावतात एखाद्या स्रीच्या अभ्रक जन्माला घालणाऱ्या प्रक्रियेसारखी.

शेती ही देखील वांझ होते. याबाबत उदाहरण द्यायचं झाल्यास एखाद्या स्रीचं उदाहरण देता येईल. काही काही स्रियांना मुलं नसतात. त्याचं कारण म्हणजे गर्भनिरोधक गोळ्या. त्यांचं सेवन करणे वा त्याचा वापर करणे. ज्याप्रमाणे एखादी स्री तिला मुल नको म्हणून गर्भनिरोधक गोळ्या घेते. त्यानंतर जेव्हा तिला मुल हवं असतं. तेव्हा तिला ते होत नाही. याचं कारण म्हणजे त्या गर्भनिरोधक गोळ्या. त्या गोळ्यांचा भरणा शरीरात जास्त प्रमाणात झाल्यास तिला मुल होत नाही. आता लोकं म्हणतील की हेही खोटं आहे. सर्वच स्रिया काही गर्भनिरोधक गोळ्या खात नाहीत. तरीही त्यांना मुल होत नाही. त्याचं कारण काय? याचंही उत्तर म्हणजे त्या स्रिया जरी गर्भनिरोधक गोळ्या खात नसतील कदाचीत. तरी त्या असे अन्नपदार्थ खात असतात की जे सल्फेटयुक्त असतात. जे शेतीतून मिळत असतं. यातही कोणी म्हणतील की ठीक आहे. आता स्रिया सल्फेटयुक्त अन्न खातात. म्हणूनच आपण असं म्हणू शकता. परंतु पुर्वी तर सल्फेटयुक्त अन्न नव्हतं. मग पुर्वीही स्रिया वांझ असायच्या. त्या का बरं वांझ असायच्या? त्याचं कारण हेच आहे. त्या स्रियांना जरी सल्फेटयुक्त अन्न जमिनीतून मिळत नव्हतं. तरी त्यांच्या शरीरात सल्फेटयुक्त क्षार पाण्यातून व हवेतून वा एकंदरीत वातावरणातून मिळायचं. त्यामुळंच त्या वांझ असायच्या नव्हे तर त्यांचं शरीर वांझ बनायचं. यावरही कोणी म्हणतील की असं होवूच शकत नाही. तर त्यावरही सांगता येईल की असं होवू शकतं. याबाबत आणखी एक उदाहरण देता येईल. वातावरण विविध रोगाचे जंतू असतात. परंतु सर्वांनाच तो आजार होत नाही किंवा एखाद्या कार्यक्रमात सगळेच लोकं जेवन करतात. परंतु फुटायला हे एखाद्यालाच होतं. प्रत्येकाला होत नाही. याचं कारण काय? याचं कारण आहे प्रत्येकाच्या शरीराची रचना. प्रत्येक व्यक्ती हा जसा पाहायला वेगवेगळा आहे. तशीच त्याच्या शरीराची रचनाही वेगवेगळी आहे. त्या शरीर रचनेनुसार प्रत्येक जीवाच्या शरीराची रोगप्रतिकारक शक्तीही वेगवेगळी आहे. काहींना आजार लवकर शिवतो. काहींना वेळ लागतो तर काहींना अजिबात शिवत नाही. त्यानुसार प्रत्येक व्यक्ती कमी अधिक प्रमाणात आजारी पडतो. काही पडत नाहीत. तीच गोष्ट वांझपणामध्येही येते. वातावरणातील किंवा पाण्यातील असलेले सल्फेट हे प्रत्येकांच्या शरीरात जातात. परंतु त्याचा परिणाम काहींवर होतो तर काहींवर होत नाही. त्यानुसार मुल जन्माची प्रक्रिया घडत असते. अगदी तीच स्थिती शेतीमाऊलीबद्दलही आहे. तीच पद्धत शेतीमाऊलीलाही लागू आहे. काही ठिकाणची शेतजमीन ही पिकाऊ आहे. काही ठिकाणची पिकाऊ नाही. ती बंजर अर्थातच कमीअधिक प्रमाणात वांझ आहे. त्यातच आपण घातक असे



रसायनं त्या जमीनीवर फवारा असतो. ज्यामुळं त्या रसायनाचा त्या जमीनीच्या पोटावर परिणाम होतो व ती पुर्ण स्वरुपात वांझ बनते. त्यामुळंच अशा जमीनीवर कितीही प्रयोग केले तरी तिचा पोत सुधारत नाही.याचाच अर्थ कितीही पैसा शेतकऱ्यांनी अशा जमीनीवर खर्च केला तरी उत्पादन पाहिजे त्या प्रमाणात येत नाही व शेतकरी राजाला वाटते की आपली जमीन पीकत नाही. मग शेतजमीन पीकत नसल्यानं कधीकाळी आत्महत्येची वेळ येते व आत्महत्या घडतेच. असे होवू नये म्हणून आधी आपली शेतजमीन सुधारण्याची प्रक्रिया राबविण्याची गरज आहे. शेतजमीन सुधारणे म्हणजे नेमके काय? शेतजमीन सुधारणे म्हणजे त्या जमीनीत रोपे लावली असता त्यात सल्फेट टाकणे नाही तर त्यात शेणखत वा कंपोस्ट खत टाकणे होय. तसंच त्यात गांडूळखत टाकणे होय. तसंच जमीनीत रोपे लावण्यापुर्वी जमीनीला शेतकऱ्यांनी आधी तयार करायला हवं.

शेतजमीन आधी तयार करायला हवी. परंतु आता ते शक्य तरी आहे का? कारण आता शेतजमीनीत टाकायला आम्हाला शेणखत मिळत नाही. लेंडीखत मिळत नाही. याचं कारण आम्ही ट्रॅक्टरने शेती करतो. आम्ही आमच्या शेताला शेणखत देणारी गाईबैलं कसायांना विकली. ती परवडत नाही म्हणून. तशाच आम्ही आमच्या घरच्या बकऱ्याही कसायाला विकल्या. आम्हाला त्यांचं मांस खाता यावं म्हणून. त्यांच्या मांसावर आम्ही आमची होती व पोळा साजरा केला. आता आम्हाला बहाल स्वरुपात पोटा साजरा करायला जीवंत बैलं दिसत नाहीत. लाकडाचे नंदीबैल वापरुन आम्हाला आमचा पोटा साजरा करावा लागतो. तुरळक स्वरुपात काही ठिकाणी जीवंत बैलं दिसतात. पुढं तेही दिसणार नाहीत. ही सत्य गोष्ट आहे. त्यावरुन सांगता येईल की आज शेती करणं घाट्याचा व्यवसाय झाला आहे.

शेतीबद्दल सांगतांना शेतीची अवस्था आज अतिशय दयनीय झाली आहे. शेतीच्या आजच्या अवस्था पाहता आज कोणीही शेती करायला पाहात नाही. कारण ती परवडत नाही. त्यामुळंच शेतीचा सन्मान घसरला आहे आणि शेती करणाऱ्या लोकांचाही. आज शेतीला सन्मान मिळत नाही व शेती करणाऱ्या लोकांनाही सन्मान मिळत नाही. शेती पीकत नसल्यानं शेती करणाऱ्या मुलांना अडाणी समजलं जातं. त्यांच्याशी विवाह करायला कोणत्याच मुली पुढं येत नाही व कोणतीच मुलगी विवाह करीत नाही हे खरं आहे व हीच वस्तुस्थितीही आहे. याच अवस्थेमुळं शेतीवर आज भुमाफियांचे भुखंड थाटले गेले आहेत. शेती कमी होत आहे व भुखंड वाढत आहेत. याचाच अर्थ असा की सुपीक पिकणारी जमीन कमी होत आहे व ओसाड जमीन वाढत आहे. ही स्थिती अशीच सुरु राहिली तर उद्या देशातील शेती करणारी मंडळी निर्माणच होणार नाही व देशातील या शेतकरी मुलांना विवाहासाठी मुली न मिळत असल्यानं देशात बलात्कार वाढतील. शेती करणारी मंडळी नसल्यानं व कित्येक एकराच्या शेत्या ओसाड पडल्यानं अन्नधान्य पीकणार नाही. त्यातच देशात अन्नधान्याचा तुटवडा भाषेल. परिणामी चोऱ्याही वाढतील. एकंदरीत सांगायचं झाल्यास देशात साऱ्याच समस्यांना तोंड फुटेल. साऱ्याच समस्या देशवासीयांना सतावतील. त्यामुळं यावर उपाय एकच. शेतीलाही सरकारनं सन्मान द्यावा. विशेष सांगायचं म्हणजे शेती आपली आई आहे. तिला आपल्या स्वआईगत जपावं. सरकारी नोकऱ्या त्याच क्षेत्रात निर्माण कराव्यात. जो शेती करेल, त्याला सरकारनंच वेतन द्यावं. एसीच्या हवेत बंद कमऱ्यात बसणाऱ्यांना वेतन देण्यापेक्षा ती गोष्ट कितीतरी चांगली होईल येत शंका नाही. तसेच तिचा पोत सुधारण्यासाठी तिच्यात सेंद्रिय खतांची निर्मीती करावी. जो गाईबैलं वा शेळ्या, मेंढ्या पाळेल, त्याला बक्षीस द्यावी. त्यांच्या हत्येवर प्रतिबंध लावावा. जो हत्या करेल, त्यांना कडक शिक्षा द्याव्यात. म्हणजेच शेणखत वा लेंडीखताची आपोआप निर्मीती होईल. याचा फायदा शेतीला निश्चीतच होईल. शेती भरपूर पीकेल. शेतीलाही भाव येईल. शेती करायला लोकं पुढं येतील. शेतकऱ्यांच्या समस्या चुटकीसरशी सुटतील. शेतकऱ्यांच्या मुलांनाही विवाहासाठी मुली मिळतील. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणार नाही. तसंच शेतकऱ्यांचं जीवनमान उंचावण्यासाठी प्रत्येक माणसानं झाडं लावावीत. जेणेकरुन शेतीसाठी लागणारा पाऊस पडेल आणि ज्या भागात झाडं असूनही पाऊस पडणार नाही. अशाठिकाणी नदीजोड वा कालवेजोड प्रकल्प राबवावा. म्हणजे निश्चीतच शेतीचेही महत्व वाढेल व जो तो शेती करायला धजेल. पुढं येईल व शेती करेल. यातूनच देशाचा विकास होईल. त्याचबरोबर आपलाही विकास होईल हे तेवढंच खरं आहे.

# तंदुरुस्त आणि निरोगी राहण्याचे तंत्र कोणते ?



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक विकासासाठी खेळाला अनन्य साधारण महत्त्व आहे. खेळाडू जीवनभर आरोग्यदायी राहतात. भारतामध्ये विविध क्रीडा प्रकार प्रसिद्ध आहेत. अनेक खेळाडू जागतिक स्तरावर चमकलेले आहेत. खेळ हा अनेक लोकांच्या आयुष्यातील अविभाज्य घटक असतो. प्रत्येकजण कोणता ना कोणतातरी खेळ प्रकार पसंत करतो. काहीजण खेळाची आवड करिअरच्या दिशेने पुढे नेतात. तर काही लोक आपल्या आवडत्या क्रीडा क्षेत्रातील खेळाडूंना फॉलो करत खेळाचा आनंद घेतात. देशाला क्रीडाक्षेत्राचा मोठा वारसा लाभलाय. यात हॉकीतील दिग्गज खेळाडू आणि जादूगार अशी ओळख असलेल्या मेजर ध्यानचंद यांना स्मरून राष्ट्रीय क्रीडा दिनाचे महत्त्व पटावे. लाखो देशवासियांसाठी प्रेरणादायी असलेले व्यक्तीमत्व दिवंगत धावपटू मिल्खा सिंग यांच्यासह पी.टी.उषा यांना उडनपरी या नावाने संबोधले जाते, तर सचिन तेंडुलकरला क्रिकेटचा देव तथा मास्टर ब्लास्टर म्हटले जाते.**

राष्ट्रीय क्रीडा दिवस २९ ऑगस्ट रोजी साजरा करण्यात येतो, का? तर महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांचा हा जन्मदिन आहे, म्हणूनच तो दिवस क्रीडादिन म्हणून देशभरात साजरा करण्यात येतो. राष्ट्रीय क्रीडा दिनी व्यक्तीच्या जीवनात खेळांच्या महत्त्वाबाबत जनजागृती केली जाते. तंदुरुस्त आणि निरोगी राहण्यासाठी सर्वांनी खेळ खेळले पाहिजेत, असा संदेश दिला जातो. या दिवशी राष्ट्रपती देशातील क्रीडा क्षेत्रात चमकदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना खेलरत्न, अर्जुन पुरस्कार, द्रोणाचार्य पुरस्कार, ध्यानचंद पुरस्कार देऊन गौरव करतात.

मेजर ध्यानचंद हे हॉकीमध्ये जगभरात गाजलेले नाव आहे. त्यांना हॉकीचे जादुगार म्हणून ओळखले जाते. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सन १९२२मध्ये वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी ते भारतीय लष्करात रूजू झाले. त्यांच्यामध्ये एका खेळाडूचे सर्व गुण होते. लष्करातील सुभेदार मेजर मनोज तिवारी यांनी हॉकी खेळण्यासाठी ध्यानचंद यांना प्रवृत्त केले, त्यांना प्रोत्साहन दिले. स्वतः तिवारींना सुद्धा खेळांमध्ये आवड होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ध्यानचंद यांनी हॉकी खेळण्यास सुरुवात केली. देशातीलच नव्हे तर जगातील महान हॉकीपटूंच्या यादीत अव्वलस्थानी त्यांचे नाव आले. त्यांना पहिल्यापासूनच खेळाची आवड होती. ते एक उत्तम खेळाडू होते. पण त्यांना हॉकीची प्रेरणा मिळाली ती सुभेदार मेजर तिवारी यांच्याकडून, जे स्वतः क्रीडाप्रेमी होते. खेळांमध्ये उत्कृष्ट असल्यामुळे ध्यानचंद यांची १९२७ साली बढती लान्स नायक पदावर झाली. त्यानंतर १९३२ साली नायक पदावर तर १९३६ साली हॉकी टीमचे कॅप्टन असताना त्यांची सुभेदार पदावर बढती



झाली. नंतर लेफ्टनंट पदावरून त्यांची बढती मेजर म्हणून झाली. ते हॉकी खेळण्यात अतिशय निपूण होते. त्यांना देशातील सर्वकालीन उत्कृष्ट हॉकी खेळाडू समजले जाते. हॉकी खेळताना चेंडूवर नियंत्रण मिळवण्यात, फटका मारण्यात, विरोधी खेळाडूकडून अलगद चेंडू काढून घेण्यात, एखादा नवीनच सर्जनशील फटका मारण्यात ते माहीर होते. त्यांनी भारतीय हॉकीला सर्वोच्च स्थानावर नेऊन ठेवले. ऑलम्पिकमध्ये भारताला हॉकीत त्यांनी ३ सुवर्ण पदके मिळवून दिली. सन १९२८, १९३२ आणि १९३६ साली भारताने हॉकीतील सुवर्ण पदक जिंकण्याची कामगिरी केली. २२ वर्षांच्या कारकीर्दीत त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर चारशेपेक्षा जास्त गोल केले, तर कारकीर्दीत एक हजारांपेक्षा जास्त गोल केले. सन १९२६ ते १९४८ या काळात त्यांनी भारतीय क्रीडा क्षेत्राला एक नवी उंची गाठून दिली. त्यांच्यापासून अनेक खेळाडूंनी प्रेरणा घेतली. राष्ट्रीय क्रीडा दिन २९ ऑगस्टला देशपातळीवर साजरा केला जातो. राष्ट्रपती भवनात या दिवशी समारोह आयोजित केला जातो. क्रीडा क्षेत्रातील मानाचे पुरस्कार विविध खेळाडूंना दिले जातात. खेळाच्या महत्त्वाबाबत जनजागृती करण्याबरोबरच या दिनी मेजर ध्यानचंद यांचे खेळातील योगदान अधोरेखित केले जाते. भारताची समृद्ध क्रीडा संस्कृती आणि वारशात ध्यानचंद यांनी दिलेल्या योगदानाला उजाळा दिला जातो. ध्यानचंद एकमेव खेळाडू आहेत, त्यांना पद्मभूषण पुरस्कार मिळाला आहे.

उत्तर प्रदेशमधील प्रयागराज, अलाहाबाद येथील एका राजपूत परिवारात दि.२९ ऑगस्ट १९०५ रोजी मेजर ध्यानचंद यांचा जन्म झाला. त्यांचे वडील सामेश्वर सिंह हे भारतीय सेनेत होते. ध्यानचंद देखील आपल्या वडिलांप्रमाणेच भारतीय सेनेत दाखल झाले आणि येथूनच त्यांचा हॉकी प्रवास सुरू झाला. त्यांचे खरे नाव ध्यानसिंह असे होते. मात्र ते नेहमी चंद्राच्या प्रकाशात हॉकीचा सराव करीत असत. त्यामुळे त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांना चंद म्हणण्यास सुरुवात केली. नंतर ते ध्यानचंद या नावाने ओळखले जाऊ लागले. त्यांनी सन १९२८, १९३२ आणि १९३६ या सलग तीन ऑलिम्पिक स्पर्धात हॉकीमध्ये भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले आणि त्यांत विजय मिळवून दिला. बर्लिन ऑलिम्पिक १९३६मध्ये भारतीय संघाने जर्मनीचा हुकूमशहा अडॉल्फ हिटलरच्या उपस्थितीत जर्मन संघाला अंतिम फेरीत ८-१ अशी धूळ चारली होती. या विजयासह सलग तीन ऑलिम्पिक स्पर्धात सुवर्णपदक जिंकून अनोखी किमया साधली. मेजर ध्यानचंद यांनी आंतरराष्ट्रीय हॉकीतील त्यांच्या २२ वर्षांच्या कारकीर्दीत चारशेपेक्षा जास्त गोल करत आपण गोल मशीन असल्याचे सिद्ध केले होते. सन १९५६मध्ये भारत सरकारने त्यांना त्यांच्या हॉकी खेळातील योगदानासाठी पद्मभूषण या सन्मानाने भुषविले, तर भारतीय टपाल सेवेने त्यांच्या स्मरणार्थ टपाल तिकीट प्रसिद्ध केले. ध्यानचंद हे भारतीय सेनेतून मेजर या पदावर असताना निवृत्त झाले. आपल्या निवृत्तीनंतर देखील ध्यानचंद यांचे हॉकीतील योगदान कायम राहिले. पटियालामधील राष्ट्रीय क्रीडा संस्थानमध्ये ते हॉकीचे मुख्य प्रशिक्षक होते. शिवाय त्यांनी राजस्थानमधील बऱ्याच प्रशिक्षण कॅम्पमध्ये देखील प्रशिक्षण दिले. सन २००२ साली दिल्लीतील नॅशनल हॉकी स्टेडिअमचे नामकरण मेजर ध्यानचंद नॅशनल हॉकी स्टेडिअम असे करण्यात आले.

हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय क्रीडा दिवस म्हणून साजरी करण्यात येते. हॉकीच्या मैदानात ध्यानचंद यांनी अविश्वसनीय कामगिरीची नोंद केली. त्यांच्या कारकिर्दीत भारताने ऑलिम्पिक स्पर्धेत तीन वेळा गोल्डन कामगिरी नोंदविली. दशकानंतही त्यांची जादू कायम आहे. मेजर ध्यानचंद हे भारतीय क्रीडा क्षेत्रातील एक प्रेरणादायी व्यक्तीमत्व आहे. सरकारतर्फे सन १९५६मध्ये त्यांना देशातील सर्वोच्च नागरिपुरस्कार असलेला पद्मभूषण देऊन गौरवण्यात आले. त्यांच्यातील कौशल्याबाबत बोलताना स्टिकला चेंडू जणू चिटकलेला असायचा, असे वर्णनही ऐकायला मिळते. एकदा तर चक्क त्यांची हॉकी स्टिक तोडून त्यांत चुंबकिय किंवा अन्य काही गोष्टीचा वापर करण्यात आलाय का? हे पाहण्यात आले होते. ध्यानचंद यांनी सन १९२६ ते १९४८ दरम्यान चारशेहून अधिक सामने खेळले. यात त्यांनी जवळपास हजार गोल डागण्याचा पराक्रम केला. हॉकीच्या मैदानात अभूतपूर्व कामगिरीबद्दल त्यांना सन्मानित करण्यासाठी सन २०१२पासून भारत सरकारने त्यांची जयंती राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरी करण्याचा निर्णय घेतला. ऑलिम्पिक स्पर्धेत हॉकी संघाने ऐतिहासिक ब्राँझ पदक पटकावल्यानंतर क्रीडा क्षेत्रात राजीव गांधी यांच्या नावाने दिल्या जाणाऱ्या सर्वोच्च खेलरत्न पुरस्काराला त्यांचे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचे दि.३ डिसेंबर १९७९ रोजी निधन झाले होते.

# उमदा आणि कृतीशील साहित्यिक: धनंजय गुडसूरकर

आधुनिक केसरी

**शिरुर अनंतपाळ येथील साहित्य आणि संस्कृती संवर्धन मंडळ शिरुर अनंतपाळ व श्री अनंतपाळ नुतन विद्यालय शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या शनिवारी दिनांक 9 सप्टेंबर 2023 रोजी एकदिवशीय मराठी साहित्य संमेलन संपन्न होत आहे. शिरुर अनंतपाळ हा लातूर जिल्ह्यातील नवनिर्मित छोटासा तालुका पण अल्पावधीत या तालुक्याने साहित्याच्या क्षेत्रात स्वत:चे वेगळेपण सिद्ध केले आहे असे म्हणावे लागेल.संमेलनाचा इतिहास पाहिला तर या तालुक्यातील हे पाचवे संमेलन. पहिले संमेलन एकोणीसशे ऐक्याऐंशी साली हालकी नावाच्या छोट्याशा खेडेगावात लक्ष्मीकांत हालकीकर या जुन्या पिढीतील मनस्वी कवीच्या पुढाकारातून संपन्न झाले होते.ते ग्रामीण साहित्य संमेलन होते.लक्ष्मीकांत तांबोळी,कवी राजेंद्र अत्रे,शरयु पोतदार इत्यादींचा त्या संमेलनात सहभाग होता. दुसरे साहित्य संमेलन शिरुर अनंतपाळ येथील नवयुवक वाचनालय व साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेले होते.**

ग्रामीण कथाकार भास्कर चंदनशिवे यांच्या अध्यक्षतेखाली अत्यंत नेटकेपणाने घेण्यात आले होते.तिसरे साहित्य संमेलन मराठी साहित्य सेवा मंडळ नावाच्या नव्याने स्थापन झालेल्या मंडळाकडून घेण्यात आलेले होते. या संमेलनात ग.पी.मनूरकर,प्रल्हाद लुलेकर यांच्यासह साहित्यिक सहभागी होते.चौथे साहित्य संमेलन जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेच्या माध्यमातून उजेड येथील रानशिवारात "बळीराजा साहित्य संमेलन" या नावाने संपन्न झाले.मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. शेषराव मोहिते हे संमेलनाध्यक्ष होते.परिसंवादात अमर हबीब,फ. मु.शहाजिंदे, रमेश चिल्ले, सुरेंद्र पाटील,डॉ. जयद्रथ जाधव असे दिग्गज अभ्यासक सहभागी होते. योगीराज माने यांच्या अध्यक्षतेखाली रंगतदार कविसंमेलन झाले होते.अवघ्या सहा महिन्याच्या कालावधीनंतर हे पाचवे मराठी साहित्य संमेलन धनंजय गुडसुरकर यांच्या अध्यक्षतेखाली मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने स्वामी रामानंद तीर्थ साहित्य नगरीत संपन्न होणार आहे. अवघ्या सहा महिन्याच्या कालावधीतच धनंजय गुडसुरकरांना दुसऱ्या साहित्य संमेलनाचा संमेलनाध्यक्ष होण्याचा बहुमान मिळतो आहे ही निश्चितच गौरवाची बाब आहे. मराठवाडा शिक्षक साहित्य संमेलन माहूर येथे संपन्न झाले त्याचेही संमेलनाध्यक्ष धनंजय गुडसुरकर हेच होते. जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक म्हणून सेवा देणाऱ्या एका प्रांजळ आणि प्रामाणिक गुरुजींनी केलेल्या साहित्यसेवेचं आणि धडपडीचं हे फळ आहे. विद्यार्थीदशेपासूनच गुडसूरकरांनी पुस्तकाचं बोट जे धरलं ते सोडलचं नाही.वाचनवेडा माणूस असंच त्यांना म्हणावं लागेल. याचं श्रेय देखील विनम्रपणे ते आपल्या गुरुजनांना देतात.वाचता वाचता विचार प्रगल्भ होत गेले.चिंतन वाढलं.साहित्याची अभिरुची वाढली.मुळातच हा माणूस माणसात सदैव रमणारा. वाचून प्राप्त झालेलं ज्ञान स्वस्थ बसू देत नव्हतं. वर्गातील मुलांना कथा ऐकवतानाच स्वतःची एक स्वतंत्र कथाकथन शैली त्यांनी आत्मसात केली.



वय वाढलं पण त्यांनी बालपण कोमेजू दिलं नाही. अनेक शाळांमधून त्यांनी कथाकथन केलं.चारैक वर्षापूर्वी आमच्या शाळेत त्यांनी त्यांची गाजलेली"धर्मा"ही कथा ऐकविली होती. तिचे स्मरण आजही आमच्या विद्यार्थ्यांना आहे. चिवचिवाट हा बालकवितासंग्रह त्यांचा प्रकाशित झालेला आहे. उदगीर शहरात प्रबोधन साहित्य परिषद नावाने साहित्य चळवळ सुरु केली. अनेक साहित्यविषयक उपक्रम राबविले. एकोणीसशे पंचान्नव साली उदगीर येथे संपन्न झालेल्या मराठवाडा साहित्य संमेलनाचा कार्यवाह म्हणून जबाबदारी पेलली.आकाशवाणी केंद्रावरुन पन्नास पेक्षा अधिक कार्यक्रमांचे प्रसारण झालेले आहे. प्रभावी वक्ता,संवेदनशील लेखक, मुक्त पत्रकार, एकपात्री कलावंत अशी बहुआयामी प्रतिमा साहित्य वर्तुळात साधना पूर्वक निर्माण केली आहे. प्रामाणिक पत्करलेली नोकरी करत साहित्य साधना सुरु ठेवणं सोप नाही परंतु त्यांनी ते लिलया करुन दाखवलं आहे.भाऊबीज कथासंग्रह, पुनर्भरण कथासंग्रह, निखऱ्यावरचा प्रवास हा ललितलेखसंग्रह ही त्यांची ग्रंथसंपदा आहे. अनेक अंकाचं संपादन देखील त्यांनी उत्कृष्टपणे करुन ठसा उमटविला आहे.वंदन,अभिवादन, कौतिकामृत ही त्यांनी संपादन केलेली पुस्तके होत. बाबा आमटे यांच्या जीवनचरित्रावर शंभर व्याख्यानांचा संकल्प करून तो त्यांनी पूर्ण केला.दिडशेव्या गांधी जयंती निमित्त दिडशे व्याख्याने दिली.या उपक्रमात सत्काराच्या निमित्ताने आलेल्या शाली या संवेदनशील माणसाने रस्त्यावर कुडकुडत असलेल्या गरीबांच्या पाठीवर घालून मायेची उब दिली.त्यांच्या या साहित्य, शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल अनेक संस्थांनी घेतली व विविध सन्मानाच्या पुरस्काराचे ते धनी झाले. नेहरु युवा पुरस्कार, दलित अकादमी साहित्य पुरस्कार, साने गुरुजी पुरस्कार, डॉ. ना.य.डोळे आदर्श शिक्षक पुरस्कार, अंनिसचा उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार अशी खूप मोठी जंत्री सांगता येईल. शासकीय स्तरावर देखील कार्य करण्याची संधी त्यांना मिळाली. महाराष्ट्र राज्य प्रौढ शिक्षण संस्थेत निमंत्रित लेखक,डी.एड.अभ्यासक्रम पुनर्रचना समिती सदस्य म्हणून त्यांनी काम केले. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळावर सदस्य म्हणून झालेली नियुक्ती हा त्यांच्या कार्याचा सर्वोच्च बहुमान होय.या मंडळाच्या इतिहासात नियुक्ती झालेले ते एकमेव प्राथमिक शिक्षक आहेत. त्यांचे भविष्य उज्वल आहे यात संदेह नाही.

अशा या कृतीशील साहित्यिक सन्मित्राची झालेली संमेलनाध्यक्ष ही निवड सार्थ असून त्यांचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन आणि खूप खूप सदिच्छा....

बालाजी जाधव,
9767709213

# आरक्षणावरुन मराठा-कुणबी आमनेसामने



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसीमध्ये आरक्षण देण्याची मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. यानंतर विदर्भातील कुणबी समाजाने या मागणीला विरोध केला आहे. यासाठी आमरण उपोषणाची तयारी देखील सुरू केली आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात मराठा समाज विरोधात कुणबी ही लढाई होण्याची शक्यता नाकारता येत नाही.मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी घेऊन अंतरवाली सराटीमध्ये मराठा नेते मनोज जरांगे यांनी उपोषणाला सुरुवात केली आहे. सुरुवातीला कुणबी नोंद असणाऱ्या मराठ्यांना ओबीसीमध्ये समावेश करण्याची मागणी असलेल्या जरांगे यांनी नंतर सरसकट मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी केली आणि वेगळ्या वादाला सुरुवात झाली.**

सरसकट मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याला अनिल देशमुख यांनी विरोध केला असून सरकार अशी मागणी मान्य करत असेल तर आम्ही रस्त्यावर उतरू असा इशारा देशमुख यांनी दिला. स्थानिक ओबीसी सेलचे भाजप पदाधिकारी यांनी देखील कुणबी प्रमाणपत्र देण्याला विरोध दर्शवित आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा दिला. सर्व शाखीय कुणबी आणि ओबीसी आंदोलन कृती समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले. यात सर्व पक्षीय कुणबी नेते एकत्रित आले होते. यात उद्यापासून आंदोलनाची घोषणा करण्यात आली आहे. राज्य सरकारने मराठवाड्यातील मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा यांना पुराव्यांच्या तपासणीअंती कुणबी प्रमाणपत्र देण्याचे सरकारने मान्य करत त्यासाठी नीवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे.यासाठी सरकारने नुकताच शासन निर्णय जारी केला.



परंतु या शासन निर्णयातून सरकारने वंशावळीच्या पुराव्याची अट वगळून महाराष्ट्रातील सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र द्यावं अशी मागणी मनोज जरांगे-पाटील यांनी केली आहे.

मराठा समाजाला आरक्षण मिळावं ही मागणी खरंतर अनेक दशकांपूर्वीची आहे. परंतु हा प्रश्न अधिक तीव्र बनला तो २०१६ मध्ये मराठा क्रांती मोर्चाने राज्यभरात लाखोंच्या संख्येने काढलेल्य मोर्चांच्यामाध्यमातून. यानंतर तत्कालीन राज्य सरकारने मराठा समाजाला शिक्षणात १२ टक्के आणि नोकरीसाठी १३ टक्के आरक्षण तर दिलं परंतु ५ मे २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयाने हे आरक्षण रद्द केलं.आता पुन्हा एकदा महाराष्ट्रात मराठा आरक्षणाची मागणी जोर धरू लागली आहे. परंतु यावेळी मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनातून समोर आलेली ही मागणी मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याची आहे. कुणबी प्रमाणपत्र मिळाल्यास कायद्याने मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण मिळू शकेल ही त्यामागची भूमिका आहे. कायद्यानुसार हे कितपत शक्य आहे? हा प्रश्न तर सरकारसमोर आहेच.

शिवाय, ओबीसी आणि कुणबी समाज संघटनांनीही या मागणीला तीव्र विरोध दर्शवला आहे. तसंच या मागणीनंतर आता मराठा आरक्षणाच्यासंदर्भात इतरही काही प्रश्न उपस्थित होत आहेत. ५२ टक्के असलेल्या ओबीसी प्रवर्गात जवळ जवळ ३५० पेक्षा जातींचा समावेश आहे. त्यातुलनेत २७ टक्के आरक्षण हे कमी आहे. त्यामुळे सरसकट मराठ्यांना ओबीसी आरक्षण दिले तर त्यातील हिस्सेकरी वाढतील आणि ओबीसीवर त्याचा परिणाम होईल. त्यामुळे मराठ्यांना ओबीसीमधून आरक्षण देण्याच्या ऐवजी आरक्षणाची सीमा ५०टक्के वरून वाढवून मराठ्यांना वेगळे १६ टक्के आरक्षण द्यावी अशी सर्व पक्षीय नेत्यांची मागणी आहे. मात्र, सध्या मराठा विरोधात कुणबी आणि ओबीसी असं चित्रं राज्यात निर्माण झालं आहे. त्यामुळे पुढे राजकीय आणि रस्त्यावरील दोन्ही समाजाचं संघर्ष झाला तर आश्चर्य वाटायला नको.

# गरीब मराठ्यांच्या विरोधात प्रस्थापित, श्रीमंत मराठा ?



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**मराठा आरक्षणाचा मुद्दा जेव्हा समोर येतो तेव्हा वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा ॲड. प्रकाश ऊर्फ बाळासाहेब आंबेडकर हे त्यांची भूमिका अगदी स्पष्ट शब्दांत मांडत असतात. गरीब मराठयांच्या विरोधात श्रीमंत मराठा आहे. हे ते वारंवार सांगत आलेले आहेत.प्रकाश आंबेडकरांचा हा मुद्दा अनेक मराठा बांधवांना पटणारा असून प्रकाश आंबेडकर यांच्या भूमिकेचे स्वागत करणारे व त्यांच्या विचारांना समर्थन करणारे अनेक मराठा बांधव स्वतःचे मत व्यक्त करत असतात. जालन्यातील आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी सुद्धा एका वृत्त वाहिनीला बोलताना प्रकाश आंबेडकर मांडत असलेल्या भूमिकेला सहमती दर्शविली. मनोज जरांगे यांनी त्यांच्या भूमिकेचे कौतुकच केले. जालन्यातील लाठी चार्ज प्रकरणी सर्वच पक्षाचे नेते मंडळी आंदोलकांना भेटण्यासाठी येत होते.**

***(मागील अंकावरून)*** याने प्रस्थापित असलेल्या श्रीमंत मराठयांना याचे काही सुख दुःख नाही. परंतु आज जो मराठा समाजातील गरीब वर्ग आहे. त्याच्यापर्यंत चांगल्या सोई सुविधां पोहचल्या पाहिजेत. त्याचे जीवनमान सुधारले पाहिजे. त्याला निदान जगण्याचं साधन तरी उपलब्ध झालं पाहिजे. आरक्षणाची गरज इथल्या गरीब मराठ्यास असून प्रस्थापित असलेल्या श्रीमंत मराठयांना जाब विचारण्याची गरज आलेली आहे. कारण आजपर्यंत चांगल्या सोई सुविधा,सत्तेपासून वंचित राहण्याची वेळ आपल्याच प्रस्थापित बांधवांमुळे आलेली आहे. याचे भान आता असायला हवे. आज फक्त मराठा समाज न म्हणता मराठा समाजाबाबत श्रीमंत मराठा आणि गरीब मराठा अस म्हणावं लागत आहे. असं वर्गीकरण करावे लागत आहे. हे खरं तर दुर्दैव आहे. पण वास्तव सुध्दा आहे, इथल्या श्रीमंत मराठ्यांमुळे गरीब मराठा हा सत्तेचा वाटेकरी होऊ शकलेला नाही.त्याला या राजकीय सत्तेपासून कायम वंचित ठेवन्याचे काम प्रत्येक निवडणूकीतून झालेले आहे.आज मराठा आरक्षणाबाबत चर्चेचा मुद्दा येतो तेव्हा गरीब मराठ्यांना आरक्षणाची नितांत गरज वाटू लागलेली आहे. मराठा समाजातील नेत्यांमुळेच मराठा समाजाला आरक्षण मिळत नसल्याची परिस्थिती आहे का? ह्या प्रश्नाचे उत्तर हो असे द्यायला काहीच चुकीचे वाटणार नाही. एकंदरीत सगळीकडेच, प्रत्येक क्षेत्रात मराठा समाजाचे अस्तित्व पाहायला मिळते.पण हे अस्तित्व प्रस्थापित मराठा व राजकारणातून स्वतःचं व्यवस्थित बस्तान बसविलेला श्रीमंत मराठा यांचेच पाहायला मिळते.१४५ आमदार हे मराठा समाजाचे लोकप्रतिनिधीत्व करत आहेत. मराठा समाजाचे नेते म्हणवून घेणारे अनेक आहेत.परंतु नेत्यांना गरिब मराठा बांधवांबाबत किती आत्मियता व तळमळता दिसून येते? समाजाच्या आरक्षणाची बाजू मांडण्यात ते का काहीच करताना दिसत नाहीत? श्रीमंत मराठ्यांना गरीब मराठ्यांच्या जगण्याबद्दल त्यांच्या जाणीवा समाज बांधव म्हणून खरच बोथट झालेल्या आहेत का?आरक्षण मिळत नाही यास मराठा समाजातीलच नेतेमंडळीच जबाबदार आहेत का? याची कारणमीमांसा आता गरीब मराठा समाजाने करायला हवी.गरीब मराठ्यांनी स्वतःची राजकीय ओळख निर्माण केली पाहिजे. त्यांनी श्रीमंत मराठ्यांवर अवलंबून न राहता स्वतः लढत राहिले पाहिजे.श्रीमंत मराठा हा इथल्या गरीब मराठ्याला सोबत घेऊन जात नाही.त्याचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करत नाही.अशी वास्तविक परिस्थिती असल्याचे दिसून येते.याचाच अर्थ असा होतो की गरीब मराठे राहण्यास एकमेव कारण इथले श्रीमंत मराठे ठरले आहेत.गरीब मराठ्यांना पुढे येण्याची संधी श्रीमंत मराठ्यांनी कधीच येऊ दिलेली नाही. गावच्या राजकारणापासून ते दिल्लीच्या खुर्ची वर विराजमान झालेला श्रीमंत मराठाच दिसून येतो. यासाठी इथल्या गरीब मराठ्यांनी ह्यांचा विजय असो म्हणत त्यांच्या नावाचा कायम जय जयकार करायचे की नाही ठरवायला हवे. परंतू गरिबी मराठयाला यांच्या कडून काय मिळाले. श्रीमंत मराठयाला आरक्षण असो किंवा नाही याचा काहिच फरक श्रीमंत मराठ्यास पडत नाही. आजही गरीब मराठा समाज बांधव वंचित राहिलेला आहे.अनेकांच्या विजया साठी खूप काही करून सुद्धा त्यांच्या हाती मात्र काहीच आलेले नाही. आज त्यालाच आरक्षण मिळवून घेण्यासाठी संघर्ष करावे लागत आहे.रस्त्यावर उतरावे लागत आहे. लाठी काठ्याने शरिरावर जखमा करून घ्याव्या लागत आहेत. मराठा आरक्षणाचा मुद्दा हा असाच अडकून ठेवण्यात आलेला असून यास इथले स्वतःला प्रतिष्ठित व प्रस्थापित मराठा समजणारे लोकप्रतिनिधीच जबाबदार बनलेले आहेत. गरीब मराठयांकडे ना मोठी शेतीवाडी आहे,ना कोणता एखादा मोठा व्यवसाय आहे. परंतु प्रस्थापित मराठा मात्र धंनदांडगा म्हणून ओळखला जातो. करोडो रुपयांची मालमसत्ता जवळ, साखर कारखाने, मोठं मोठ्या पतसंस्था, शिक्षण संस्था,मोठ मोठे उद्योग कंपन्या, राजकीय दृष्ट्या प्रस्थापित असल्याने हे सगळंच कसं मालामाल करणारे असल्याने त्यांच्या अनेक पिढ्या घरी बसून जगतील एवढं कमवून ठेवलेले आहे.त्यामुळे गरिब मराठ्याला लढावेच लागेल. आता संघर्ष केला तरच पुढच्या पिढयासाठी हाती लागेल लागेल. पक्ष फुटून एका रात्रीत सरकारे बदलू शकतात, पहाटेचा शपथविधी होऊ शकतो,घटनेची पायमल्ली करणारे प्रकार घडले जात आहेत. नेत्यांच्या स्वार्थासाठी सर्व काही शक्य असताना गरीब मराठ्याला आरक्षण मिळवुन देणारि किमया कायदेशीर मार्गाने का शक्य नाही? असा सवाल आहेच.

१८१ दिवस
मुदत ठेवीवर मिळवा
11%
व्याजदर
*नियम व अटी लागू
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in

राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक
राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स


चंदुलाल बियाणी
चेअरमन

कार्यरत शाखा :

मुख्य कार्यालय व शाखा : मोंढा मार्केट, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072178/88
पंचशिल नगर शाखा : विद्यानगर जलालपूर रोड, पंचशिल नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072809
मुख्य शाखा विस्तारित कक्ष : ऊर्जा प्लाझा, गणेशपार रोड, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072181
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-१ : दिगंबर कॉम्प्लेक्स, नेहरू चौक (तळ), परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072180
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-२ उड्डान पुला जवळ, शिवाजी नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072805
सिरसाळा शाखा : बड़े निवास, जुने बस स्टैंड रोड, सिरसाळा, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072184
अंबाजोगाई शाखा: प्रशांत नगर, बस स्टॅण्डच्या मागे, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072183
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-१ : मोहन कॉम्प्लेक्स, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072802
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-२ घाटनांदुर, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072808
बीड शाखा : जिजामाता चौक, मोंढा रोड, ता. जि. बीड. 9130072221
सोनपेठ शाखा : स्नेह सदन, विटा रोड, सोनपेठ, ता. सोनपेठ, जि. परभणी. 9130072186
गंगाखेड शाखा : डॉक्टर लेन, एच.डी.एफ.सी. बँकेसमोर, गंगाखेड, जि. परभणी. 9130072807
विभागीय कार्यालय व महेश नगर शाखा : अपना बजार २०४ २०६, आकाशवाणी जवळ, औरंगाबाद 9130072176 / 77
राजा बजार शाखा : बालाजी मंदिर समोर, राजा बजार, शहागंज, मोंढा, ता. जि. औरंगाबाद. 9130072022
माळीवाडा विस्तारीत कक्ष : नाशिक रोड, माळीवाडा, ता. जि. औरंगाबाद. 9130072803

अंबड शाखा: जालना-बीड रोड, महावीर चौक, आंबड, जि. जालना. 9130072804
जालना शाखा : मेन बस स्टैंड रोड, जालना, ता. जि. जालना. 9130072806
जालना विस्तारीत कक्ष-१ : जांगडे कॉम्प्लेक्स, जालना-अंबड रोड, ता. जि. जालना. 9130072226
नांदेड विस्तारीत कक्ष : पहिला मजला, गुरूकृपा मार्केट, महावीर चौक, ता. जि. नांदेड. 9130003070
उदगीर विस्तारीत कक्ष : पहिला मजला, लासूणे कॉम्प्लेक्स, देगलूर रोड, उदगीर, जि. लातूर. 9130072190
टोकवाडी विस्तारीत कक्ष: परळी-बीड रोड, टोकवाडी, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072224
दिंद्रुड विस्तारीत कक्ष : शेप कॉम्प्लेक्स, परळी-बीड रोड, दिंद्रुड, ता. माजलगाव, जि. बीड. 9130002070
लातूर विस्तारीत कक्ष : कव्हा रोड, शिवनेरी गेट जवळ, लातूर 9130002070
औराद विस्तारीत कक्ष : मेन रोड, कृष्णा ऑईल मिल समोर, औराद शहाजनी, ता. निलंगा, जि. लातूर. 9130003044
बीड विस्तारीत कक्ष : मोंढा मार्केट, संतोषी माता मंदिर समोर, बीड, ता.जि. बीड. 9130072221
उमरगा शाखा : शिवाजी महाविद्यालय जवळ, बालाजी नगर, मेन रोड, उमरगा, जि. उस्मानाबाद.
परभणी शाखा: कापसे भवन, कच्छी बजार, सरदार वल्लभभाई पटेल रोड, परभणी.
अहमदनगर शाखा: शॉप नं. ३ व ४ बेसमेंट, मोरया कॉर्नर, मोरया मंगल कार्यालय, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
केज शाखा : वकीलवाडी, कानडी रोड, केज, ता. केज. जि. बीड.
माजलगाव शाखा : गाळा क्र.८, सिद्धेश्वर कॉम्प्लेक्स, गढी कॉर्नर, गढी रोड, माजलगाव, ता. माजलगाव, जि. बीड.

नियोजित शाखा :
धर्माबाद
उमरखेड
नाशिक
पंढरपूर
रेणापूर
पुणे
अकोला

कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176, 9130072177

# स्वामी रामानंद तीर्थ यांना मरणोत्तर भारतरत्न द्या

## शिरुर अनंतपाळ येथे झालेल्या साहित्य संमेलनाचा एकमताने ठराव



आधुनिक केसरी न्यूज

**शिरूर अनंतपाळ :** हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचे प्रणेते स्वामी रामानंद तीर्थ यांना मरणोत्तर भारतरत्न देण्यात यावा असा ठराव शिरुर अनंतपाळ येथे झालेल्या साहित्य संमेलनात एकमताने मंजूर करण्यात आला. या ठरावांसह एकूण सात ठरावांना मंजूरी देत या संमेलनाचे सूप वाजले. शिरूर अनंतपाळ येथील स्वामी रामानंद तीर्थ साहित्यनगरीत प्रसिद्ध लेखक धनंजय गुडसूरकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या साहित्य संमेलनाच्या समारोपात ७ ठरावास मंजूरी देण्यात आली. शिवाजीराव मादलापूरे,राजकुमार अचवले, सत्यनारायण बंगाग, हणमंत पटणे, तानाजी सोनटक्के, सुरेखा उस्तुर्गे, गुरूनाथ शिंदाळकर यांनी हे ठराव मांडले तर संजय चिद्रेवार, मधुमती पाटील, किरण कोरे, सुधाकर देवंग्रे, परमेश्वर तोंडारे, महालिंग चाकोते, किशनराव इंदुलकर यांनी या ठरावांना अनुमोदन दिले. चांद्रयान३ व आदित्य एल २ यानाच्या यशस्वीतेसाठी इस्त्रोच्या सर्व शास्त्रज्ञांच्या अभिनंदनाचा ठरावही यावेळी मंजूर करण्यात आला. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा केंद्र शासनाने त्वरीत द्यावा, ग्रंथालयीन प्रश्नांची सोडवणूक करावी, शेतीविषयक प्रश्नांची सोडवणूक करावी या ठरावांना सभागृहाने मान्यता दिली. संमेलनाच्या समारोपाच्या अध्यक्षीय भाषणात संमेलनाध्यक्ष धनंजय गुडसूरकर यांनी या मुक्तीलढ्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची गरज प्रतिपादन केली. व्यासपीठावर स्वागताध्यक्ष अड.संभाजीराव पाटील, मार्गदर्शक व शिक्षण तज्ञ प्रभाकरराव कुलकर्णी , डॉ. मन्मन भातांब्रे, मंडळाचे अध्यक्ष बालाजी येरोळे,सचिव शिवाजी मादलापूरे,कोषाध्यक्ष धनाजी लखनगावे उपस्थित होते. स्वामी रामानंद तीर्थ हे या लढ्याचे पूर्ण हैद्राबाद राज्याचे नायक राहिले. स्वातंत्र्यानंतर सत्तेकडे पाठ फिरवून जनसामान्यांच्या हक्कासाठी लढणा-या स्वामीजींच्या कार्याने भारतीय स्वातंत्र्याला पुर्णत्व प्राप्त झाले. स्वामीजींना मरणोत्तर भारतरत्न देऊन या कार्याचा गौरव करावा अशी मागणी संमेलनाध्यक्ष गुडसूरकर यांनी यावेळी बोलताना केली.

# राष्ट्रीय उद्यान नाट्योत्सव स्पर्धा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुकास्तरीय राष्ट्रीय विज्ञान नाटयोउत्सव 2023-24 साजरा करण्यात आला. याप्रसंगी खुलताबाद तालुक्यातील शाळाची ही स्पर्धा समंत भद्र विद्या मंदिर येथे वेरूळ येथे घेण्यात आली. नाट्य निवडसाठी पाच विषय होते१.(अन्न (मिलेट) श्रेष्ठ आहार),२. (खाद्य सुरक्षा)३.(दैनंदीन जीवनातअधूनिक त्रंत्रज्ञान) ४.(आरोग्य सेवेतील सध्याची (वर्तमान) प्रगती).५(समजातील अंधश्रद्धा/ अंधविश्वास) या विषयाशी अनुसरून शाळानी नाटकातून विषय स्पष्ट केले याप्रसंगी समंतभद्रा विद्या मंदिर वेरूळचे मा.मुख्याध्यापक व कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीयुत गुलाबचंद बोराळकर सर यांच्या हस्ते नाट्य उत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच समंत भद्र विद्या मंदिर वेरुळ चे पर्यवेक्षक तसेच शालेय अभ्यासक्रम मंडळाचे सदस्य श्री सुकुमार नवले सर प्रमूख पाहुणे पदी होते यांनी नाट्य महोत्सवातील शाळांच्या विद्यार्थ्यांना नाटकातून विज्ञानिष्ठ संकल्पना आणि वैज्ञानिक दृष्टीकोन कशाप्रकारे नाटक विज्ञानातून स्पष्ट करावे मग ते अन्नसुरक्षा, आरोग्य, अथवा भरडधान्य, अंधश्रद्धा, अंधविश्वास असेल या विषयाना अनुसरून सरांनी मार्गदर्शन केलं त्यानंतर या स्पर्धा घेण्यात आल्या त्यात तालुक्यातील घोडेगाव येथिल सद्गुरु जनेश्वर माध्यमिक विद्यालय घोडेगाव येथील शाळेचा प्रथम क्रमांक आला तसेच समंतभद्र विद्या मंदिर वेरुळ या शाळेचा दुसरा क्रमांक आला प्रथम आलेल्या नाट्य महोत्सवात सद्गुरू जनेश्वर माध्यमिक विद्यालयाचे विज्ञान शिक्षक संजय गोमलाडू सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले विजयी झालेल्या विद्यार्थ्यांचे व संजय गोमलाडू सरांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. साईनाथ पा जाधव साहेब, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा.संदिप जाधव सर, शाळेचे मुख्यध्यापक खैरनार सर, कार्यक्रमाचे अध्यक्ष गुलाबचंद बोराळकर सर व प्रमूख पाहुणे सुकुमार नवले सर यांनी सत्कार केला व डी.आर.जैन सर,सुहास मिश्रिकोटकर सर व अंकुश ठोळे सर याणी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शभेच्छा दिल्या.






# ई-केवायसी करा, अन्यथा अपात्र व्हाल : कृषी अधिकारी भारत कासार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत गेल्या दोन महिन्यापासून पीएम किसान ईकेवायसी करण्याची मोहीम हाती घेतली गेली आहे. फुलंब्री तालुक्यामध्ये एकूण 34484शेतकरी पीएम किसान अंतर्गत पात्र असून आजही 4134 शेतकऱ्यांची ईकेवायसी प्रलंबित आहे. यामध्ये बरेच शेतकरी मयत आहेत काही बाहेरगावी राहणारे आहेत तर काही नोकरदार आहेत भूमीहिनआणि पती-पत्नी असे काही शेतकरी असून ज्या शेतकऱ्यांनी ईकेवायसी केली नाही त्या शेतकऱ्यांचे नाव पी एम किसान यादीतून अपात्र करण्यात येणार आहे. सदर बाबतीत कृषी विभागाने गेल्या दोन महिन्यापासून गावोगावी जाऊन मोहिम हाती घेतली स्वतः फेस रीडिंग ॲपच्या द्वारे ईकेवायसी केली तरी सुद्धा अजूनही बरेच शेतकरी प्रलंबित आहेत या सर्व शेतकऱ्यांनी 20 सप्टेंबर 2023 च्या आत ई केवायसी न केल्यास त्यांचे नाव अपात्र करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी, असे तालुका कृषी अधिकारी भारत कासार यांनी कळविले आहे.

# गेवराई सेमी येथे अखंड हरिनाम सप्ताह

आधुनिक केसरी न्यूज

**गेवराई सेमी :** अखंड हरिनाम सप्ताह गेवराई सेमी गोवर्धन गड तालुका सिल्लोड जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे सप्ताहात काल्याची किर्तन सेवा गोवर्धन गडाचे महंत श्री हभप प्रल्हाद महाराज विघ्नेबाविकर बिड यांची झाली.

प्रमुख उपस्थिती हभप कैलासजी महाराज ढेपले पाथ्रीकर तालुका फुलंब्री जिल्हा छत्रपती संभाजीनगर, हभप भागवत महाराज आव्हाळे वासडीकर, हभप नामदेव महाराज आगळे पैठणकर, हभप आप्पा महाराज पिंपळे भोकरदन, हभप विष्णू महाराज वाघ पैठण समवेत आसाराम घुगे साहेब वासडी, हभप सुपडु महाराज घुगे वासडी, समस्त ग्रामस्थ भजनी मंडळी वारकरी महिला भजनी मंडळी उपस्थित होते.



# खड्ड्यामुळे झालेल्या अपघातात तरुणाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** भिवंडीतील वाडा महामार्गावरील खड्ड्यामुळे दुचाकीवरुन तोल जाऊन आकाश जाधव (२२) या तरुणाचा ३१ ऑगस्टला अपघात होऊन मृत्यू झाला होता. त्याच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे गणेशपुरी पोलिसांनी गुरुवारी रस्त्याचा ठेकेदार मे. जिजाऊ कन्स्ट्रक्शन रोड बिल्डर्स प्रा.लि कंपनीवर गुन्हा दाखल केला आहे. आकाश जाधव हा त्याच्या मित्रासह ३१ ऑगस्टला भिवंडीहून मुंबईच्या दिशेने दुचाकीवरून प्रवास करत होता. वाआकाशला उपचारासाठी मुंबईतील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान आकाशचा मृत्यू झाला. ज्या मार्गावर आकाशचा अपघात झाला, तो रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत येतो. या रस्त्याचे काम मे. जिजाऊ कन्स्ट्रक्शन रोड बिल्डर्स प्रा.लि या कंपनीला देण्यात आले होते. या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी अनेकदा देयके काढण्यात आली, परंतू रस्ता दुरुस्त करण्यात आला नाही. आकाशच्या मृत्यू प्रकरणी तक्रारीच्या आधारे गणेशपूरी पोलीस ठाण्यात ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती गणेशपुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक धर्मराज सोनके यांनी दिली.

प्रासंगिक

# मोफत रुग्णसेवेतून वारकरी धर्म जोपासणारे 'धन्वंतरी'

## डॉ. बाजड दांपत्याचा स्तुत्य उपक्रम



आधुनिक केसरी

***मरीज के लिए दवा का इंतजाम भी करते हैं, और दुआ का काम भी करते हैं..! समझ नहीं आता एक डॉक्टर इतने से वक्त में, इतने सारे काम कैसे करते हैं..!!***

सेवावृत्तीने व प्रसंगी रुग्णांना विनामूल्य वैद्यकीय सेवा देणारे डॉक्टर आज-काल तसे दुर्मिळच. पण आपल्या घराण्याचा पारंपारिक चालत आलेला वारकरी संप्रदायाचा धर्म वैद्यकीय सेवेतून जोपासणारे नावली या छोट्याशा गावातील डॉक्टर सागर संजय बाजड व त्यांच्या सहचारीणी डॉक्टर सौ. शितल सागर बाजड हे दांपत्य त्याला अपवाद ठरत आहेत. रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा मानून " एकादशी " निमित्त अत्यंत सेवाभावी वृत्तीने मोफत रुग्णसेवा देत आहेत. केवळ मोफत रुग्ण तपासणीच नव्हे; तर त्यांचेच धाकटे बंधू रुपेश बाजड हे आपल्या वारकरी मेडिकलच्या माध्यमातून तपासणी झालेल्या रुग्णांना मोफत औषधी देऊन घराण्याची वारकरी पंथाची पताका समर्थपणे पेलत आहेत. आज एकादशीनिमित्त त्यांच्या या स्तुत्य कार्याचे कौतुक करण्याच्या उद्देशाने आधुनिक केसरीचा हा अल्पसा प्रयत्न.



वसंत खडसे
9373578429

रिसोड तालुक्यातील नावली या छोट्याशा गावातील संजय श्रीराम बाजड हे व्यवसायाने सर्वसाधारण शेतकरी आहेत. वडिलोपार्जित चालत आलेली शेती आणि वारकरी धर्माची परंपरा त्यांनी सुद्धा कायम राखली आहे. दर पंधरवड्या एकादशीचे व्रत ते आजही आपल्या धर्मपत्नी सौ. ज्योती संजय बाजड यांच्या सोबतीने जोपासत आहेत. संत तुकाराम, ज्ञानेश्वर, नामदेव महाराज यांच्या शिकवणीतून जनसेवा हीच ईश्वरसेवा ते मानतात. शेतकरी कुटुंबातून असलेले संजय बाजड यांची पंढरपूरच्या विठ्ठलावर आघाध श्रद्धा आहे. मात्र, अंधश्रद्धेला त्यांच्याकडे मुळीच थारा नाही..! म्हणूनच त्यांनी आपली दोन मुलं सागर बाजड व रुपेश बाजड यांना कुठल्याही धार्मिक गुलामगिरीत न गुरफटू देता, शिक्षणाची कास धरायला लावली. त्यांच्या या बळावरच, आज डॉ. सागर बाजड आपल्या वैद्यकीय क्षेत्रात तर रुपेश बाजड एक मनमिळावू औषध विक्रेता म्हणून समाजसेवा करत आहेत. एकादशीनिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेऊन तपासलेल्या रुग्णांना मोफत औषधी सुद्धा दिली आहे. सदर शिबिरात सांधेदुखी, अस्थमा, व्यसनमुक्ती आदी जुनाट आजारावर डॉ. सागर बाजड व डॉ.सौ. शितल सागर बाजड यांनी रुग्णांचे मोफत आरोग्य तपासणी केली आहे. तर राजस्थान आयुर्वेदालय व वारकरी मेडिकल यांच्या संयुक्त विद्यमाने रुग्णांना मोफत औषधी वितरित करण्यात आली आहे. याप्रसंगी जवळपास १४० रुग्णांनी या सेवेचा लाभ घेतला आहे. दरम्यान, कंपनीचे प्रतिनिधी संतोष निवाल यांनी आयुर्वेद औषधीचे महत्त्व उपस्थितांना पटवून दिले. सदर कार्यक्रमाच्या निमित्ताने राहुल बाजड, विशाल मोरे, हरीश मोरे, मयूर शिंदे यांच्यासह अनेक प्रतिष्ठित व्यक्तींची उपस्थिती होती.

# अशोक चव्हाणांच्या ताफ्याला घेराव

## आंदोलकाच्या पायावरून गाडी घातल्यामुळे मराठा समाज संतप्त

आधुनिक केसरी न्यूज

**बाबूराव गोणारकर**

**धर्माबाद :** माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण हे तालुक्यातील काँग्रेस पदाधिकाऱ्यांची बैठक आणि लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयास भेट देण्यासाठी शनिवारी (ता.९) धर्माबादच्या दौऱ्यावर आले होते. मात्र त्यांना मराठा समाजाच्या प्रचंड रोषाला समोर जावे लागले आहे. पानसरे चौकात त्यांचा ताफा मराठा युवकांनी अडवून धरला. मोठ्या झटापटीनंतर पोलिसांच्या सुरक्षेच्या गरड्यात त्यांना सुरक्षित शहारा बाहेरकाढून देण्यात आले. महाराष्ट्र शासनाने मराठवाड्यातील मराठा समाजाच्या वंशवळीत, निजामकालीन दस्तऐवजात ज्यांची कुणबी अशी नोंद आहे. त्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याचे आणि त्यावर अभ्यास करण्यासाठी शिंदे आयोगाची स्थापना करण्यात आली. मात्र यावर मनोज जरांगे हे समाधानी नसून सरसकट मराठा समाजाला कुणबी जातीचे ओबीसी प्रमाणपत्र मिळावे यावर ते ठाम आहेत.



मनोज जरांगे पाटील यांच्या याच मागणीला व उपोषणाला पाठींबा देण्यासाठी धर्माबाद तहसील कार्यालयासमोर आजपासून (ता.९) सकल मराठा समाजाच्यावतीने साखळी उपोषणास प्रारंभ झाला आहे.आणि याच दिवशी अशोकराव चव्हाण धर्माबाद दौऱ्यावर आले होते.काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा मेळावा माहेश्वरी भवनमध्ये आयोजित करण्यात आला होता.

मराठा आंदोलकानी मोठ्या संख्येने या हॉलबाहेर जमून अशोक चव्हाण यांच्या विरोधात घोषणाबाजी सुरु केली. त्यामुळे तब्ब्ल तीन तास अशोकराव हॉलमध्ये अडकून पडले होते.शेवटी अशोकराव स्वतः बाहेर येऊन आंदोलकांची समजूत काढून आपण तुमच्या सोबत असल्याचे सांगून समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र आक्रमक आंदोलक ऐकण्याच्या मानसिकतेत नव्हते. शेवटी अशोकराव चव्हाणांनी काढता पाय घेण्यास सुरवात केली मात्र आंदोलकांनी त्यांच्या गाडीचा ताफा अडविण्याचा प्रयत्न केला. यात पोलीस व आंदोलकामध्ये मोठी झटापट झाली. या ताफ्याने पांडुरंग पाटील कारेगावकर यांच्या पायावरून गाडी घातल्यामुळे आंदोलक अजून आक्रमक झाले. त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. उद्या नांदेड जिल्ह्याचे खासदार प्रतापराव पा. चिखलीकर हे धर्माबाद दौऱ्यावर येणार होते. मात्र मराठा आंदोलकांचे आक्रमक पवित्रा पाहता. त्यांनी आपला दौरा गुंडाळाला असल्याची सूत्रांकडून माहिती मिळाली आहे.

# सोयगाव तालुक्यात सार्वजनिक गणेश मंडळांना घरगुती दराने वीजपुरवठा देणार

## उपकार्यकारी अभियंता नीरज बिदे यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील व सावळदबारा परिसरात यंदा सार्वजनिक गणेश मंडळांना महावितरणकडून तात्पुरत्या स्वरुपात आणि त्वरित वीजजोडणीची सुविधा उपलब्ध केली आहे. या जोडणीसाठी घरगुती वीजदर आकारण्यात येणार आहे. तरी सर्व परिसरातील सार्वजनिक गणेश मंडळांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन निरज बिदे उपकार्यकारी अभियंता सोयगाव यांनी केले आहे. गणेश मंडळांना तात्पुरत्या स्वरूपातील वीजजोडणीसाठी नोंदणी प्रमाणपत्र, स्थानिक स्वराज्य संस्था मंडप परवानगी, पोलिस स्थानक परवाना, विद्युत निरिक्षक यांचे वीजसंच सुरक्षित असल्याचे प्रमाणपत्र,



वीज मागणी अर्ज, वीजसंच मांडणी चाचणी अहवाल व राष्ट्रीयकृत बँक खाते पासबुक छायांकित प्रत इ. कागदपत्रे आवश्यक आहेत. गणेश मंडळांनी आवश्यक कागदपत्रासह नजीकच्या फर्दापूर,बनोटी, सोयगाव व सावळदबारा महावितरण कार्यालयाशी संपर्क साधावा. गणेशोत्सव काळात कोणत्याही प्रकारचे वीज अपघात होऊ नये यासाठी मंडप, रोषणाई व देखाव्यांची उभारणी करताना लघुदाब व उच्चदाब विद्युत वाहिन्या, वितरण रोहित्रे इ. यंत्रणेपासून सुरक्षित अंतर राखावे. मंडपातील वीजसंच मांडणी करताना विद्युत सुरक्षा नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. मंडपातील वीजसंच मांडणी मान्यताप्राप्त विद्युत ठेकेदारांकडून करून घेण्यात यावी. गणेश मंडळांनी विद्युत सुरक्षा उपाययोजनांमध्ये तडजोड करू नये. आपात्कालीन स्थितीकरिता कार्यक्षेत्रातील महावितरणच्या शाखा अभियंत्यांचे मोबाईल क्रमांक नोंदवून ठेवावेत. याबरोबरच महावितरणच्या मध्यवर्ती ग्राहक सुविधा केंद्राचे 1912, 1800-212- 3435 व 1800-233-3435 हे टोल फ्री क्रमांक ग्राहकांच्या सेवेत 24 तास उपलब्ध आहेत, अशी माहिती उपकार्यकारी अभियंता निरज बिदे सोयगाव यांनी दिली आहे.

# हलक्या पावसातच रस्त्यावर खड्डेच खड्डे!

आधुनिक केसरी न्यूज

**वाशीम :** शहरातील वस्ती विरहीत भागातील रस्त्यावर करोडो रुपये खर्च केल्या जात आहेत. तर मानवी वस्तीतील रस्त्याची प्रचंड दुरवस्था झालेली आहे. केवळ शहरातीलच नव्हे तर ग्रामीण भागात लाखो रुपये खर्चून बांधलेल्या रस्त्यावर खड्डेच खड्डे पडली आहेत. हलक्या व मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या पाण्यामुळे निकृष्ट रस्त्याचे पितळ उघडे पडले असल्याचा आरोप जनतेतून केला जात आहे. शहरातील पुसद नाका,शिवराणा चौक, लोणसुने चौकापर्यत गेलेल्या या रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली आहे. हा रस्ता खड्यात की खड्यात रस्ता स्थिती आहे. पावसामुळे साचलेले पाणी व मधुन गेलेली भुमिगत गटार त्यामुळे रस्त्यावरून जातांना नागरीकानां जीव मुठीत धरुन प्रवास करावा लागत आहे. दोन वर्षापासुन माजी न प सदस्य ॲड विनोद खंडेलवाल यांनी नगर परिषद मुख्याधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी, यांच्याकडे निवेदन देवुनही कुठलीच कारवाई होत नाही. अशीच अवस्था शहरातील व ग्रामीण भागातील रस्त्यांची झालेली असून अनेक नवे कोरे रस्ते पावसाच्या पाण्यामुळे खड्डेमय झाली आहेत.

# लम्पीमुळे लाल कंधारी वळूचा मृत्यू!

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** लम्पी आजारामुळे संपूर्ण नांदेड जिल्ह्यातील गायवर्गीय पाळीव पशू धनाना लम्पी आजारामुळे घेरले असून औषध उपचार करून ही जनावरे मृत्यू पावत आहेत. शिवणी जामगा येथील शेतकरी निवृती पांडुरंग जामगे यांचा १ वर्षे वय असलेला लाल कंधारी वळूचा लम्पी आजारामुळे मृत्यू झाला आहे.

सदरील लाल कंधारी वळूवर शेवडी बा, येथील पशुवैद्यकीय डॉ गोरे यांनी औषध उपचार केले होते पण त्यांना यश आले नाही. दिनांक ९ सप्टेंबर २०२३ रोजी सदरील लाल कंधारी वळुचा मृत्यू झाला सदरील वळु ७० हजार रुपये किंमती होता, आठ दिवसापूर्वी शिवणी जामगा येथील बैलाचा लम्पी आजारामुळे मृत्यू झाला आहे, या विषाणू जन्य लम्पी आजारामुळे मृत्यू पावलेल्या जनावरांना आर्थिक मदत शासनाने द्यावी अशी मागणी शेतकरी करत आहेत.



# मराठा समाज आरक्षणासाठी रामनगर येथे उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** मराठा समाजाच्या आरक्षणासाठी रामनगर येथे शुक्रवारी एकदिवसीय उपोषण करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सुभाष पाटील पांडभरे यांनी सांगितले की, मराठा समाजाला आरक्षण मिळणे ही काळाची गरज आहे. ते मिळालायच हवे. ट्रिपल इंजिन सरकारला जर मराठा समाजाला खरोखरत आरक्षण द्यायचे असेल तर मा. सर्वोच्च न्यायायलाच्या ५०% हून अधिक आरक्षण न देण्याचा निर्णयाला संसदेच्या माध्यमातून बदलून घ्यावे लागेल, मा.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, समाजाविषयी यांना खरोखर कळवळा असेल तरच ट्रिपल इंजिन सरकारची गाडी दिल्लीला धडकावावी लागेल व जे संसदेचे ५ दिवसीय विशेष अधिवेशन बोलावले आहे, त्याआधी राज्य सरकारने ठराव मंजूर करुन केंद्राकडे सादर करावा, तात्काळ बोलाविलेल्या अधिवेशनामध्ये केंद्र सरकारला धारेवर धरून मराठा आरक्षणाचा ठराव मंजूर करुन घ्यावा. तोच आणि तेवढाच मार्ग आहे. यावेळी मराठा समाजाच्या आरक्षणावर तात्काळ निर्णय घ्यावा नसता शांततेचे मागन चालू असलेले आंदोलनाचा अंत



पाहू नये. आंतरवाली सराटी येथील चालू असलेल्या उपोषणास्थळी अमानुषपणे महिला, वृध्द उपोषणस्थळी केलेल्या लाठीमारांची न्यायालयीन चौकशी करण्यात यावी. सरसकट सकल मराठा समाजाला ओबीसीमध्ये समावेश करण्यात यावे. त्याच्याकडे पुरावा नसतील किंवा असतील त्यांना ओबीसी जात प्रमाणपत्र देण्यात यावे. कुठलाही पुरावा किंवा अट न घालता. केंद्र सरकारने बोलाविलेल्या विशेष अधिवेशनात आरक्षणाबाबत ठराव घेवून मंजूर करण्याबा मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व गृहमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी तात्काळ राजीनामा देवून राजकिय सन्यास घ्यावा. आता कुठल्याही आयोगाची स्थापना करण्यात येवू नये. खुर झाले आयोग, खुप शिफरशी, खु झाले अहवाल सादर करणे आता नको समित्या आश्वासने आता फक्त आणि फक्त तात्काळ आरक्षणावर निर्णय घ्यावा. इतर ओबीसी समाजाला आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला सरसकट आरक्षण देण्यात आंदोलकावरील गुन्हे तात्काळ मागे घेण्यात यावे आदी मागण्या करण्यात आल्या.

या उपोषणास गंगारामजी कापसे, सुभाष पांडभरे पाटील, रमेश अण्णा मुळे, गौतम लांडगे, भाऊसाहेब वाघ, सुधाकर दानवे, अंकुशराव चौधरी, भास्कर लहाने, वल्लभ भंडारी, संदिपान काळे, राहुल सावंत, विष्णु गुंठाळ, सतिश पवार, ज्योती गिते, दशरथ मानवतकर, सचिन वाघ, सुरेश हिवराळे, ॲड. उध्दव वाघ, सुभाष शुक्ला, दिपक म्हस्के, शिरीष जाधव, अंजली कदम सौ. कांताबाई अहिरे, अतुल खंडगांवकर, सचिन भोळे, उषाताई सरगळ, पंडीत आंबेकर, चंद्रमुनी काळे, वैभव बोडखे, प्रविण केदार, उमाकांत शिंदे, हेमंत नरवडे, अमोल संकपाळ, कल्याण लिफणे सांबू नुरदारे, लक्ष्मण टोपे, मनोहर सोनवणे, अरुण जाधव, अरुया डिपोले भास्कर निकाळजे, राजु निछे, ज्ञानेश्वर जाधव, लोहार साहेब, साहेबराव पवार, सुभाष चव्हाण, मंगेश शिंगारे, सिताराम मोरे, नाचन डोणगांव भिमराव शेजुळ, अमोल तोरणमल, सुरेश हिवराळे, शिवाआप्पा बेंद्रे,विनायक पवार सर, पुनटकर सा मोटे पाटील, ॲड. मिलिंद काकडे, आतिश गवळे, मनोज वाघमारे, सुरेश राऊत, राजु राऊत, अतुल इंगळे, रामेश्वर शिंदे, गुलाब जाधव, कैलास जुमडे, संतोष सोनटक्के, उमेश कापसे, संतोष बागुल, संतोष पवार, करण बगे, जिवन मास्के, दवरे पाटील, सचिन काळे, निलेश गाडेकर, ज्ञानेश्वर खंदारे आदी उपस्थित होते.

# मराठा आरक्षणासाठी सरणावर बसून उपोषणास सुरुवात

## छत्रपती संभाजी राजे यांनी दिली नैताळे गावास भेट

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथील मनोज जारंगे पाटील यांनी गेले दहा - बारा दिवसापासून मराठा आरक्षणासाठी आमरण उपोषण सुरू केलेले आहे. त्यांना समर्थन म्हणून नैताळे येथील मराठा शेतकरी वाल्मिक गंगाराम बोरगुडे यांनी आज दि.१० सकाळी ८ वाजेपासून नैताळे येथे ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषणास सुरुवात केली आहे. दरम्यान आज उपोषणाची माहिती मिळताच छत्रपती संभाजीराजे यांनी उपोषणस्थळी भेट दिली. कालपासून उपोषणाची तयारी सुरू असून गावातील तरुणांनी घरोघरी जाऊन लाकडे व गोवऱ्या जमा केल्या. आज सकाळी असंख्य तरुण उपोषणस्थळी जमा झाले आहेत. 'जय जिजाऊ, जय शिवराय', एक मराठा लाख मराठा' अशा घोषणा देऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास हार घालून उपोषणास सुरुवात करण्यात आली. उपोषणस्थळी भजनी मंडळी टाळ मृदुंगाच्या गजरात भजन सुरू आहे. बोरगुडे यांना पाठिंबा म्हणून गावातील असंख्य युवक उपोषणास बसले आहे. निफाड पोलीस स्टेशनचे पो.निरीक्षक बी.एस.महाजन यांच्या नेतृत्वाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

> सरकारने राजकारण बाजूला ठेवत सर्वसामान्य गरीब मराठा समाजाला मराठा आरक्षणाच्या माध्यमातून समाजाला न्याय द्यावा . तमाम आंदोलक मराठा बांधवांच्या भावना शासनापर्यंत पोहोचवून समस्त मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी मी अहोरात्र प्रयत्न करीत आहे, आंदोलकांनी आमरण उपोषण करत असतांना तब्येतीची काळजी घ्या .
> **– छत्रपती संभाजीराजे, संस्थापक स्वराज्य पक्ष**




# शिवपुराण कथेत जीवनाचे कल्याण : डॉ. शर्मा

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** शिवपुराण ही कथा मनुष्याच्या जीवनाचे कल्याण करणारी आणि ही कथा समजून घेण्यासाठी आपल्याला संतांची गरज असते. ज्या व्यक्तीच्या आयुष्यात संत आले त्याच्या आयुष्यात ईश्वर आल्याशिवाय राहत नाही. 'साधू-संत येता घरा । तोची दिवाळी दसरा' या संत तुकाराम महाराजांच्या ओवींचे स्मरण त्यांनी यावेळी करून दिले. संत हे भक्त आणि ईश्वर यांच्यामध्ये पुलाचे काम करतात. म्हणूनच संत संगती व संत परंपरेला आपल्या भारत देशामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. असे येथील पेठ विभागातील ग्रामदैवत श्री संत जनार्दन महाराज मंदिर संस्थान सभागृहात अयोजीत शिवमहापुराण कथा कार्यक्रमात दि.१० रविवार रोजी कथेचे तिसऱ्या दिवसांचे पुष्प गुंफताना डॉ.महेंद्र शर्माजी महाराज यांनी असे प्रतिपादन केले आहे.
यांनी पुढे त्यांनी हे सुद्धा सांगितले की, जेव्हा मनुष्याच्या आयुष्यात ईश्वर येतो तेव्हा त्याच्या आयुष्यातील सर्व चिंता, दुःख नाश पावतात व मनुष्य अव्यक्तीगत जीवन जगू लागतो . असाच ईश्वरीय स्पर्श आपल्या आयुष्याला व्हावा असे जर आपल्याला वाटत असेल तर आपल्याला संत संगती शिवाय पर्याय नाही, असे मोलाचे मार्गदर्शन त्यांनी शिवपुराण कथेच्या माध्यमातून उपस्थितांना केले. यावेळी नानासाहेब जोगवाडकर, शिवपंडित शिवाप्पा खके गुरुजी, संस्थान अध्यक्ष गुरुप्रसाद शर्मा, सपोनि बालाजी गायकवाड, संत जनार्धन महाराज संस्थान अध्यक्ष रामजी शर्मा, भगवानराव राऊत, सरपंच अनिरुद्ध चव्हाण, बाबुराव केदारी, नानासाहेब राऊत, हरिजी शर्मा, ईद्रंजीत घाटुळ, चारठाणा प्राथमिक आरोग्य केंद्र वैद्यकीय अधिकारी डॉ. वैष्णवी भुते, डॉ.राजेश पोकर्णा, लक्ष्मण राऊत, भगवानअप्पा क्षीरसागर, सुधाकर देशपांडे, केशवराव भुते, ॲड. धर्मेंद्र शर्मा, मुरलीधर करसकर, नामदेव राऊत, गोपीनाथ राठोड, बापुराव हेंद्रे, भालचंद्र केदारी,प्र भाकर कुर्हे, एकनाथ आवचार, गुरूप्रसाद देशमुख, निलेश चव्हाण, जितेंद्र शर्मा, मुकुंद भाग्यवंत, ओमप्रकाश लोखंडे, जगदीश देशमुख, मुरलीधर घाटुळ,यांच्यासह आदी या शिवपुराण कथा श्रवण करण्याकरीता येथील परीसरातील व पंचक्रोशीतील अनेक शिव भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. येथे सुरु असलेल्या शिवपुराण कथेची सांगता दि.१२मंगळवार रोजी होणार या कार्यक्रमास सर्व शिवपुराण, शिव भक्तानी, श्री संत जनार्दन महाराज भक्तगण, शिष्यगण व सर्व भाविक भक्तांनी महाप्सादास उपस्थित राहावेत असे आवाहन श्री संत जनार्दन महाराज मंदिर संस्थान अध्यक्ष व शर्मा परीवार यांनी केले आहे.



# लिहे तांडा येथील संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान परस्पर बंद; लाभार्थी वंचित

## तलाठी सुरेखा मॅडम यांचा अजब कारभार

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील शेंदुर्णीजवळ असलेल्या लिहे तांडा येथील कार्यक्षेत्रातील संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थी ग.भा.मथुराबाई ऊमराव पाटील वय ६५ वर्ष राहणार लिहे तांडा यांचे परस्पर ग्रामसेवक यांच्या सांगण्यावरून मयत दाखवून अपात्र ठरवून त्यांचे लाभ गेल्या सहा महिन्यांपासून अनुदान बंद करण्याचा प्रकार जामनेरच्या तहशिल कार्यालयात समोर आला आहे.विशेष म्हणजे लाभार्थी अपात्र ठरविल्याबाबत लाभार्थींना कोणतीही माहिती न देता त्यांना योजनेतून बाद करण्यात आल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.कुठलीही चौकशी न करता तलाठी सजा सुरेखा पडोळे मॅडम यांनी लाभार्थी जिवंत असताना मयत दाखवून जामनेर च्या तहशिल कार्यालयात नेऊन दिला आहे.इकडे राज्य आणि केंद्र शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या संजय गांधी निराधार योजनेत दिव्यांग, कुष्ठरोगपीडित, ज्येष्ठ निराधार आदींचा समावेश आहे. वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून या लाभार्थींना लाभ दिला जातो. आर्थिक लाभाची ही योजना असल्याने अनेक निराधार, ज्येष्ठ वृद्ध यांना योजनेचा मोठा दिलासा मिळतो; परंतु अचानक योजनेतून बाद केल्याने गेल्या सहा ते सात महिन्यांपासून लाभार्थी अनुदानापासून वंचित आहेत. विशेष म्हणजे लाभाची वाट पाहून सहा ते सात महिने झाले तरीही अनुदान मिळत नसल्याने चौकशी केली असता लाभ बंद करण्याची माहिती देण्यात आल्याने लाभार्थी ग.भा. मथुराबाई ऊमराव पाटील विधवा महिला यांना धक्काच बसला आहे. याप्रकरणी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे औरंगाबाद विभागिय अध्यक्ष गोकुळसिंग राजपूत यांनी चौकशी केली असता जामनेर तहशिल कार्यालयामध्ये तलाठी मॅडम सुरेखा पाडळे यांनी सदरिल जिवंत महिला व्यक्तीचा मयतचा अहवाल दिला आहे असे सांगण्यात आले ग्रामसेवक यांना फोन केला तर म्हणतात कि मयतचा अहवाल मी दिला नाही आणि तलाठी सुरेखा पडोळे मॅडम सांगते ग्रामसेवक चे नाव म्हणजे अशे उडवा उडवीचे



उत्तरे ऐकण्यास मिळाली आहे.एकतर तलाठी सुरेखा मॅडम ही गोंदेगाव येथून उंटावरून शेळ्या हकलते गावात ध्वजारोहण असो किंवा ग्रामसभा असो एकाही कार्यक्रमात तलाठी सुरेखा मॅडम यांची उपस्थिती नसते कायम गैरहजर असतात आणि गावात झिरो तलाठी आपल्या जागेवर पाठवून स्वतःची सर्व कामे घरुनच पाहणी केली जाते मग तो शेतकऱ्यांच्या पिकाचा सर्वे असो किंवा इतर कुठल्याही प्रकारचा सर्वे असो तो तलाठी सुरेखा पडोळे मॅडमच्या घरूनच पूर्ण होत असतो, याकडे आता प्रशासन लक्ष देईल का अशी प्रतिक्रिया लाभार्थी मथुराबाई ऊमराव पाटील यांनी औरंगाबाद विभागिय अध्यक्ष गोकुळसिंग राजपूत यांच्याशी बोलताना सांगितले आहे. तिन वेळा लाभार्थी मथुराबाई ऊमराव पाटील यांनी जामनेर येथे तहशिल कार्यालयात जाऊन उंबरठे झिजंवले कि माझा पगार येत नाही. तेव्हा माहिती झाले कि तुम्ही तर जिवंत आहे आणि तलाठी सजा सुरेखा पडोळे यांनी तुमचा अहवाल मयत चा आणून दिला आहे तुम्हाला आता या योजनेचा लाभ मिळू शकत नाही. निकषांचे उल्लंघन करून चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे योजनेचा लाभ घेणाऱ्यांचे लाभ सुरू असताना पात्र आणि गरजू लाभार्थी असतानाही त्यांना अपात्र ठरविण्याचा महाप्रताप लिहे तांडा येथील तलाठी मॅडम सुरेखा पाडळे यांनी केल्याने या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार संघर्ष समितीचे औरंगाबाद विभागीय अध्यक्ष तथा उपसंपादक गोकुळसिंग राजपूत यांनी केली आहे.

# कनकशीळ येथे आयुष्मान भव योजना, मराठवाडा मुक्तीसंग्राम सप्ताहास सुरवात

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील कनकशीळ येथे शासनाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या आयुष्मान भारत आणि मराठवाडा मुक्ती संग्राम सप्ताह ची सुरवात कनकशीळ उपकेंद्रात करण्यात आली असून निर्देशानुसार पुढील १५ दिवस विविध आरोग्य विषयक उपक्रम उपकेंद्राच्या अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये राबविण्यात येणार असून त्यामध्ये आभा कार्ड काढणे, गोल्डन कार्ड काढणे, आयुष्मान भारत कार्ड काढणे, ई-संजीवनी कॉल करणे, असंसर्गजन्य आजार तपासणी व निदान, क्षय रोग, कुष्ठरोग, मोतिबिंदु रुग्ण निदान करणे, कुपोषित बालक शोधणे, विविध रक्त तपासण्या करने व आरोग्य विषयक माहितीचा प्रचार व प्रसार करणे, असे विविध उपक्रम या पंधरवाड्यात उपकेंद्राच्या वतीने राबविण्यात येणार आहे.



यावेळी जास्तीत जास्त नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होऊन आरोग्य विषयक विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे आव्हान समुदाय आरोग्य अधिकारी डॉ रमेश शेळके यांनी केले. या उपक्रमासाठी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. किरण शिंदे व वैद्यकीय अधिकारी डॉ. निलोफर अंजुम यांच्या मार्गदर्शनाखाली, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.रमेश शेळके, आरोग्य सहायक विजय जाधव, आरोग्य सेवक अनिल बनकर, आरोग्य सेविका ज्योती चिमणे, गटप्रवर्तक आशा आदी परिश्रम घेत आहे.

# इस्लापूर ग्रामीण पत्रकार संघटनेच्या अध्यक्षपदी मारोती शेळके यांची एकमताने निवड

आधुनिक केसरी न्यूज

**दशरथ आंबेकर**

**किनवट :** रविवार दि. १० ऑगस्ट रोजी इस्लापूर येथील शासकीय विश्रामगृह मध्ये ज्येष्ठ पत्रकार नारायण दंतलवाड, गंगाराम गडमवाड, परमेश्वर पेशवे, काशिनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक संपन्न होऊन इस्लापूर ग्रामीण पत्रकार संघटनेचे अध्यक्षपदी मारोती शेळके यांची एकमताने निवड करण्यात आली. तर उपाध्यक्षपदी ईश्वर जाधव, गणेश जयस्वाल यांची सचिव पदी सर्वानुमते निवड करण्यात आली. या निवडी प्रसंगी गौतम कांबळे, रावसाहेब कदम, प्रमोद जाधव, गजानन वानोळे विशाल भालेराव, विलास भालेराव, राजेश गायकवाड, दशरथ आंबेकर, इम्रान जबार घोडके, किरण वानखेडे, या सर्वांची प्रामुख्याने उपस्थिती होती. या बैठकीमध्ये पत्रकारिता क्षेत्रात काम करत असताना पत्रकारांच्या अडीअडचणी सामोरे जाणार इस्लापूर भागाच्या सर्वांगीण



विकासासाठी पावले उचलणार शिक्षण आरोग्य या क्षेत्राकडे सुद्धा लक्ष वेधणार व इस्लापूर तालुका घोषित करून किनवट जिल्हा घोषित करण्यासाठी वेळेप्रसंगी जनआंदोलन छेडणार असल्याची माहिती नूतन अध्यक्ष मारोती शेळके यांनी दिली.

# मातृशक्तीचा गौरव करून जोपासली सिंधू संस्कृतीची परंपरा

## टिटवी येथे बंजारा परंपरेतील तीज सण उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** भारतीय संस्कृतीत प्रत्येक जाती धर्मातील विविध उत्सव वेगळ्या ढंगाने व परंपरेने साजरे केले जातात. त्यामुळेच आपल्या देशातील विविधतेत एकता दिसून येते. इसवी सन पूर्वपासून बंजारा समाजात चालत आलेला सर्वात महत्वाचा तीज उत्सव टिटवी परिसरात नायक कारभारी डावो सलो लावा लष्कर यांच्याकडे मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. कधीकाळी डोंगरदऱ्यात राहणाऱ्या बंजारा समाजात तीज म्हणजे आनंदाची पर्वणीच असते. श्रावण महिन्यात ठिकठिकाणी बंजारा तांड्यांवर तिज उत्सवाची पाहायला मिळतो. सध्या तीज उत्सवाच्या बंजारा लोक गीतांनी तिथल्या लोकांवर चांगलच गारुड घातलं आहे. पारंपारिक वेशभूषेत फेर धरून नाचणाऱ्या महिला मुली सहभागी झाल्या. डोंगरदऱ्यात राहणाऱ्या बंजारा समाजाने आपली वेगळी परंपरा,लोकसंस्कृती आणि वेगळेपण जपल्याचे या निमित्ताने दिसून आले. महिला प्रधान संस्कृतीचे दर्शन घडवणारा हा उत्सव मातृ शक्तीला वंदन करणारा असून, आद्यगण "गण गौर" यांचे महत्व विशद करणारा आहे.

दर सालाबाद प्रमाणे यंदाही उत्सव टिटवी परिसरातील तांड्याचे नायक कारभारी यांच्याकडे आयोजित करण्यात आला. यावेळी मोठया प्रमाणात बंजारा बांधव आणि भगिनी या उत्सवाला उपस्थित होत्या. यावेळी नायक कारभारी डावो सालो लावा लष्कर पाहुणे,नाईक सखाराम राठोड, कारभारी श्रीराम पवार,ज्ञानेश्वर राठोड, दिलीप राठोड मेंबर, डॉ.अमोल राठोड, गोर पवन राठोड, डफली वादक ज्ञानदेव राठोड, राम चव्हाण,राजू जाधव, बळीराम राठोड बंजारा समाज बांधव उपस्थित होते.

**'गौरी'स्वरूप धान घेऊन तांड्याला घालतात प्रदक्षिणा**

तिज हा उत्सव म्हणजे बंजारा समाजाची दिवाळीच. तिज म्हणजे बंजारा समाजाच्या लोक संस्कृतीचे सर्व पदर आणि पैलू उलगडणारा उत्सव. या उत्सवात दहा दिवसाआधी अविवाहित मुली एका टोपलीत 'गौरी स्वरूप' धान (गहू) पेरतात, रोज त्याला पाणी घालून बोलीभाषेत आराध्य देवतांची गीते म्हटली जातात. विसर्जनाच्या दिवशी डोक्यावर 'गौरी'स्वरूप धान घेऊन वाजत गाजत तांड्याला प्रदक्षिणा केली जाते. गावालग तलावात तीज विसर्जन केले जाते .लग्न होऊन सासरी गेलेल्या मुली, महिला तिज उत्सवाच्या निमित्याने माहेरी येतात. त्यामुळे या उत्सवाला वेगळे महत्त्व आहे.



# आयएसओ जिल्हा परिषद शाळा मल्हाराचे तेरा विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये सिलेक्ट

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** आयएसओ जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मल्हारा,पंचायत समिती अचलपूर. महाराष्ट्र शासन शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता पाचवी मध्ये शाळेचे 13 विद्यार्थी सिलेक्ट. आलोक सत्यपाल तायडे, आर्यन दीपक पुराण, नैतिक दीपक गंधाने, प्रथमेश अनिल भक्ते, मंथन विष्णू पारवे, समीक्षा अमोल बोरेकार, खुशी नंदू हिवराळे, सोनिया गजानन भक्ते,आचल गणेश शेळके, दुर्गा श्रीकृष्ण निर्मळे, नियती अशोक बेठे, श्रुती राजू कासदेकर, राशी अशोक सुयेस्कार या तेरा ही विद्यार्थ्यांना शाळेतील मुख्याध्यापक कु.शीला सोळंके, केंद्रप्रमुख श्रीकृष्ण उघडे, आदर्श शिक्षक बबलू कराळे, कल्पना चौधरी, बबीता पंडित, किरण साखरकर, रश्मी पानझाडे, दिनकर राऊत, रतिराम मावस्कर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये तेरा विद्यार्थी सिलेक्ट झाल्यामुळे सर्वत्र विद्यार्थ्यांचे तथा शिक्षक यांचे कौतुक होत आहे, तसेच त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. यानिमित्त गावातील प्रथम नागरिक मा.नारायणरावजी बोरेकार तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीअध्यक्ष मा. उत्तमरावजी शेळके, उपाध्यक्ष मा. दीपकराव तायडे तसेच सर्व सदस्य यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन तथा शिक्षकांचे कौतुक केले.




# वडोद बाजार येथे महादेव मंदिरात भंडारा

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** श्रावण महिन्या निमित्त महादेव मंदिरात पूजा आरती व महाप्रसाद भंडारा संपन्न फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथे महादेव मंदिरात पूजा अभिषेक करण्यात आला. नंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले यावेळी या भंडारा च्या कार्यक्रमासाठी भाविकांनी गर्दी केली होती. यावेळी भजन. कीर्तन कार्यक्रम संपन्न झाला यावेळी वडोद बाजार येथील ना, भविक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त पालखी मिरवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील टिटवी येथे परब्रम्ह परमेश्वर अवतार भगवान श्रीकृष्ण यांच्या जन्मोत्सव सोहळा निमित्ताने सात दिवस श्रीकृष्ण मुर्तीचा विशेष ठेवून स्थापना केली होती. श्रीकृष्ण गोकुळाष्टमीनिमित्ताने दरवर्षीप्रमाणे यंदाही बुधवारी मध्यरात्री कृष्णजन्माष्टमी मोठ्या भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. कृष्ण जन्मानंतर शेकडो उपस्थित भाविकांनी कृष्ण भगवान की जय हो, राधे-कृष्णा गोपाळ-कृष्णा जयघोष करत दर्शनाचा लाभ घेतला.आणि शेवटच्या दिवशी फुलांनी सजविलेल्या पाळण्यात श्रीकृष्णाची मूर्ती ठेवण्यात येऊन जन्म साजरा करण्यात आला. त्यानंतर फटाके फोडून मुरमुरे,पेढे वाटप करण्यात आले. श्री कृष्णजन्माष्टमीनिमित्ताने बुधवारी सायंकाळी सवाद्य पालखी, ढोलताशे, लेझीम पथकाच्या गजरात श्रीकृष्णाच्या मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली. फुलांनी सजवलेल्या पालखीत कृष्णाची मूर्ती ठेवण्यात आली होती. मिरवणुकीत शेकडो भाविक भक्तांनी व महिलांनी वेषभूषा परिधान करून व पेठे बांधून सहभागी झाले होते.गावात पूर्ण चौक सजविण्यात आले होते महिलांनी तर श्रीकृष्णाच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी एकच गर्दी केली होती. श्रीकृष्ण नाम घोषनाने टिटवी नगरी दुमदुमून गेली होती.याप्रसंगी अखिल भारतीय पंचकृष्ण परिषदचे अध्यक्ष प.पु.मं. आचार्य श्री लोणारकर बाबा महानुभाव गोपाळ आश्रम बुलढाणा टिटवी सारख्या छोट्या गावात येऊन उपदेशी मंडळी व ग्रामस्थ यांना श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळा निमित्ताने मार्गदर्शन केले.अखिल भारतीय पंचकृष्ण युवक मंडळाचे यांच्या वतीने कार्यक्रमाचे व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. १२ ते ३ महाप्रसादाचा कार्यक्रम झाला. यावेळी शेकडो भाविकांनी लाभ घेतला, तर गुरुवारी ध्वजारोहण सरपंच भागवत जाधव, पोलिस पाटील ज्ञानेश्वर राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प पु मं आचार्य लोणारकर बाबा महानुभाव बुलढाणा, सरपंच भागवत जाधव, मुख्याध्यापक अरुण गवळी, ज्ञानेश्वर मख सर, उपसरपंच लहू प्रेमसिंग राठोड, ग्रामपंचायत सदस्य, पोलिस पाटील ज्ञानेश्वर राठोड, तंटामुक्ती अध्यक्ष, प्रमोद पाटील, ताराचंद राठोड, मुरलीधर गौलखेडे, समाधान सपकाळ,कडुबा जाधव,मारोती लवंगे, श्रावण चंडोल, विनोद जाधव, उपदेशी मंडळी, सावळदबारा येथील अखिल भारतीय पंचकृष्ण युवक मंडळाचे पदाधिकारी, पुजारी मंडळी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सामाजिक सलोखा राखूनच आपले सण उत्सव साजरे करावे : पोनि राजेंद्र टाकणे

आधुनिक केसरी न्यूज

**पिलीव :** समाजात फूट पाडणाऱ्या व तेढ निर्माण करणाऱ्या शक्तींच्या विरोधात लोकप्रतिनिधींनी राजकीय संघर्ष केला पाहिजे. आपल्या गावामध्ये सामाजिक सलोखा ठेवण्यासाठी तुमच्यासारख्या तरुण पिढीने हिंदू-मुस्लिम भेदभाव न ठेवता एकमेकांशी प्रेमाने व आदराने वागून एकमेकांचे सण उत्सवात साजरे केले पाहिजेत, असे माळशिरस पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांनी पिलीवसह परिसरातील गणेश उत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना व मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त होणाऱ्या आयोजित कार्यक्रमातील पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. काल शनिवार दिनांक ०९ सप्टेंबर २०२३ रोजी गणपती विसर्जन व मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे दरवर्षीप्रमाणे पिलीवच्या मुख्य पेठेतून निघत असलेल्या मिरवणुकी संदर्भात संबंधित मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना जातीय सलोखा राखण्याची व कायद्याचे पालन करून आपले सण उत्सव साजरे करण्याचे आवाहन करण्यासाठी टाकणे यांच्या टाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली पिलीव येथील विश्रामगृहामध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पिलीवच्या मुख्य पेठेतून पोलीस बांधवांनी रूट मार्च करून पिलीव परिसरातील पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना डीजे,डॉल्बी न लावता व आपल्यामुळे इतर लोकांना नाहक त्रास होऊ नये याची काळजी घेऊनच पारंपारिक वाद्याचा उपयोग करून मिरवणुकी काढाव्यात व कोणतेही अनुसूचित प्रकार घडू नये याची काळजी घ्यावी.असे टाकणे यांनी सांगितले.




हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन



अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# पैठण येथे गणेशोत्सव, ईद-ए-मिलादसाठी, शांतता कमिटीची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** पैठण शहर आणि ग्रामीण भागातील गणेशोत्सव मंडळाची विशेष, शांतता कमिटीची बैठक शनिवार दिनांक ९ सप्टेंबर रोजी १ वाजता अभिनंदन मंगल। कार्यालयात संपन्न झाली. व्यासपीठावर औरंगाबाद ग्रामीण पोलीस अधीक्षक मनिष कलवानीया, उपविभागीय पोलीस अधीक्षक सिध्देश्वर भोर, पोलीस निरीक्षक संजय देशमुख, नायब तहसीलदार मंगेश साबळे उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांनी उपस्थित गणेशोत्सव मंडळाच्या सदस्यांचे स्वागत केले व गणेशोत्सव काळात घ्यावयाच्या विशेष दक्षतेबद्दल माहिती दिली. सर्व गणेशोत्सव मंडळांनी मंडपासाठी लागणारी रीतसर परवानगी घ्यावीत, तसेच ईद मिलाद सण असल्याने, कुठलाही अनुचित प्रकार घडणार नाही, सर्व ठिकाणी शांततेने गणेशोत्सव व ईद मिलाद सन पार पडेल. या दृष्टीने सर्वांनी सहकार्य करून, पोलीस प्रशासनालाही सहकार्य करण्याची विनंती केली. यावेळी व माजी मंत्री अनिल पटेल,सुरज लोळगे,शहर ये काजी यांनी गणेशोत्सव व ईद काळात गणेश भक्तांना शांतता ठेवण्याचे अवाहन करत गणेश मंडळानी देखाव्यातुन नवीन पिढीला मार्गदर्शक ठरतील असे देखावे सादर करावे याविषयी मार्गदर्शन केले. गणेश मंडळाच्या सुचना ऐकून गणेशोत्सव काळात मंडळाच्या पदाधिकारी यांनी काळजी घ्या,तसेच विज व मिरवणूक काळात रस्ते या बाबतीत संबंधित अधिकार्यांना सुचना देण्यात येणार आहे,तसेच एक गाव एक गणपती बसवणार्या गावचा विशेष सत्कार करून गणेश मंडळाच्या वतीने सांस्कृतिक,धार्मिक तसेच चागला उपक्रम राबवणार्या मंडळाचा देखील पुरस्कार देण्यात येणार आहे. गणेश उत्सव व ईद ए मिलाद या काळात हिंदू मुस्लिमानी सलोख्याचे संबंध ठेवा.असे अवाहन ग्रामीण पोलीस अधीक्षक मनिष कलवानीया यांनी केले. तसेच नोंदणी कृत गणेश मंडळानी पोलीस परवानगी घ्यावी,मिरवणूक दरम्यान तसेच उत्सव काळात विज वितरणकंपनी अधिकारीनी काळजी घ्यावी,ध्वनिप्रदूषणच्या नियमानुसारच वाद्ये वाजुन पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे अवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी सिध्देश्वर भोर यानी केले. यावेळी मा.मंत्री अनिल पटेल, मा.नगराध्यक्ष सुरज लोळगे, भाजपा महामंत्री लक्ष्मण औटे, कांचनकुमार चाटे, जिल्हा सरचिटणीस अश्विनी लखमले, पोलीस उप निरिक्षक, निलेश केळे, संतोष माने, गणेश सुरवसे, दशरथ बुरकुल, सचिन आगलावे, सुधीर वाव्हुळ, मनोज वैद्य, पोलीस पाटील सह गोकुळ लगडे,विनोद खराद, शहर व ग्रामीण भागातील सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.



# शिरवळ ग्लोरी इंग्लिश स्कूलमध्ये दहीहंडी

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** ग्लोरी इंग्लिश मिडीयम स्कूल शिरवळ येथे श्री कृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने दही हंडीचे आयोजन करण्यात आले होते.विद्यार्थ्यांकडून राधा कृष्णाची वेशभूषा साकारत हा उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला. ग्लोरी इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक जितेंद्र भणगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उत्सव दिमाखात साजरा होत असताना त्यांनी विद्यार्थ्यांना उत्सवाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली.विद्यार्थ्यांनी साकारलेल्या वेशभूषेचे कौतुक सुद्धा करण्यात आले.दहीहंडीचे पूजन वैशाली भणगे व शाळेतील इतर सर्व शिक्षकांनी केले.दहीहंडी फोडण्यासाठी शाळेतील विद्यार्थीच गोविंदा बनले होते.इयत्ता ५ वी ते १० वी वर्गातील विद्यार्थ्यांनी वेगवेगळे मनोरे तयार करीत दहीहंडीला सलामी दिली.हा दहीहंडी फोडण्याचा मान इयत्ता ८ वी वर्गातील विद्यार्थ्यांना मिळाला. दहीहंडी फोडल्या नंतर सर्व विद्यार्थ्यांनी सामूहिक पणे डान्स केला. एकंदरीत हा उत्सव आनंदी वातावरणात संपन्न करण्यात आला.शाळेत होत असलेल्या वेगवेगळ्या कार्यक्रमा मुळे शाळेतील विद्यार्थ्यांना भारतीय सणाची माहिती मिळत आहे. ओळख होत आहे.ग्लोरी स्कूल चा उपक्रमशील शाळा असा नावलौकिक दिवसेंदिवस वाढत आहे. असे उपक्रम घेण्याचा मानस शालेय प्रशासनाचा आहे.कार्यक्रमाचे नियोजन इयत्ता ८ वी तील सर्व विद्यार्थ्यांनी केले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वैशाली भणगे,शितल भणगे, विद्या भारती, वैशाली खोपडे, ज्योती लोखंडे, किरण खोपडे, हेमा दीक्षित, जया डेंबडे, अर्चना गायकवाड, दिपाली पवार, नूतन जाधव, अर्चना कांबळे, दिपाली कुंभार,वर्षा शिंदे, सविता कांबळे, सोनल बर्गे आदींनी सहकार्य केले. कार्यक्रमाची सांगता वंदेमातरमने करण्यात आली .

# स्वच्छतेच्या जागरात नागरिकांनी सहभागी व्हावे : तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर

आधुनिक केसरी न्यूज



**रिसोड :** शहर स्वच्छ करण्यासाठी आणि नागरिकांना मूलभूत सोयी देण्यासाठी नगरपरिषद ही केवळ यंत्रणा आहे. परंतु संपूर्ण शहर स्वच्छ ठेवायचे झाले तर, त्यात नागरिकांचा सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. लोकसहभागाशिवाय कुठलाही हेतू साध्य होत नाही. त्यासाठी प्रशासनाकडून राबविण्यात येणाऱ्या स्वच्छतेच्या जागरात नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे..! असे आवाहन रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी केले आहे. शहरात स्वच्छता जनजागृती मोहीम व प्लास्टिक वापरावर आळा घालण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने तहसील कार्यालय, नगरपरिषद, समता फाउंडेशन आणि जमात ए इस्लामी हिंद यांच्या संयुक्त विद्यमाने संपूर्ण शहरात स्वच्छतेचा जागर हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्या निमित्ताने नुकतीच नगर परिषदेच्या सभागृहात सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर बोलत होत्या. पुढे बोलताना, तहसीलदार मॅडम यांनी प्लास्टिकचा वापर मानवजातीसह संपूर्ण प्राणीमात्रांसाठी व पर्यावरणासाठी किती घातक आहे याची विस्तृत माहिती दिली.शहर स्वच्छतेची मुख्य जबाबदारी संबंधित यंत्रणेची असली, तरी " माझं रिसोड स्वच्छ रिसोड " सुंदर रिसोड माझी जबाबदारी..! हे ब्रीद लक्षात घेऊन प्रत्येक नागरिकाने या मोहिमेत सहभागी व्हावे, अशी अपेक्षा तहसीलदार तेजनकर यांनी व्यक्त केली. उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, स्वच्छता सर्वेक्षणात नागरिकांचा सहभाग वाढावा यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रयत्न सुरू असून, नगरपरिषद, समता फाउंडेशन व जमात ए इस्लामी हिंद यांच्या सहकार्याने स्वच्छता मोहीम सफल होणार असल्याचा विश्वास तहसीलदार यांनी व्यक्त केला. सदर कार्यक्रमात जमात ए इस्लामी हिंदचे जिल्हाध्यक्ष शेख वकार यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष मदनशेठ बगडिया, वरिष्ठ पत्रकार मोहनराव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रस्ताविक राजेश पट्टेबहादूर यांनी, तर सूत्रसंचालन प्राध्यापक जायभाये यांनी केले. सदर कार्यक्रमास व्यापारी, पत्रकार, नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी व शहरातील प्रतिष्ठित नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते. पट्टेबहादूर यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.

# ग्रामीण भागातील हुशार, कष्टाळू विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा : रचनाताई पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** ग्रामीण भागातील विद्यार्थी हुशार आणि कष्टाळू आहेत. त्यांच्यामध्ये ज्ञान संपादन करण्याची क्षमता आहे. परंतु करिअरसाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी यामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थी कमी पडत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा.यासाठी श्रीनिवास पाटील फाउंडेशन युवा ३६० डिग्री काम करत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या मध्ये संभाषण कौशल्य, वक्तृत्व कौशल्य, व्यवस्थापन कौशल्य निर्माण झाली पाहिजेत, असे मनोगत श्रीनिवास पाटील फाउंडेशन च्या उपाध्यक्षा रचनाताई पाटील यांनी व व्यक्त केले. श्रीनिवास पाटील फाउंडेशन व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने लोणंद येथील रयत शिक्षण संस्थेचे शरदचंद्र पवार महाविद्यालयात एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत



होत्या.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव होते.तसेच कला विभागाचे उपप्राचार्य प्रा. भिमराव काकडे, वाणिज्य विभागाचे उपप्राचार्य बाबासाहेब सायमोते, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा एम.डी.नायकु आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्य शाळेस महाविद्यालयातील १५२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ४५ विद्यार्थ्यांची इंटरशिप प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार लोकल टू ग्लोबल या संज्ञेत बसण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन आणि सर्वांगीण विकासासाठी या कार्यशाळेमधून ग्रामीण तरुणांनी स्वतःचे व्यक्तिमत्व विकसित केले पाहिजे.असे प्रभारी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांनी म्हटले. स्वतःसाठी भाकरी भाजून खाणे प्रकृती, दुसऱ्यांनी भाजलेली भाकरी हिसकावून खाणे विकृती आणि स्वतःसाठी भाजलेली भाकरी स्वतःची भूक विसरून भुकेलेला देणे ही संस्कृती आहे.असे अंशुमन पाटील म्हणाले. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी विद्यार्थिनी प्रशिक्षणार्थी आविष्कार जगताप, रोहन पडळकर, श्रेया यादव, निकिता यादव,अथर्व यादव हे युवक युवती उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.छाया सकटे यांनी केले.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा
सुका मेवा
मसाले
क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू
स्टीलच्या वस्तू
ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे
साफ सफाईचे सर्व साहित्य
आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर